रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक १८९
www.ramprahar.com

गुरुवार, २५ जानेवारी २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

'हिंदू धर्म संपवण्याची भाषा करणारे उद्धव ठाकरेंना मान्य?'/२

नवी मुंबईत मराठी भाषेचा गौरव; आज विविध स्पर्धा/६

भारत-इंग्लंड यांच्यात आज कसोटी सामना/८

## महाराष्ट्राचे मंत्रिमंडळ फेब्रुवारीमध्ये जाणार अयोध्येला



**मुंबई :** अयोध्येतील राम मंदिराचे नुकतेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले आहे. त्या वेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संपूर्ण मंत्रिमंडळ एकदिवस ठरवू आणि अयोध्येत दर्शनाला जाणार असल्याचे म्हटले होते, परंतु अयोध्येत सध्या होणारी गर्दी लक्षात घेता भाजपने श्रीरामाच्या दर्शनासाठी पुढील महिन्यात दर्शनासाठीचा प्लान तयार केला आहे. भाजपशासित राज्यातील मुख्यमंत्र्यांचा हा मेगा प्लान तयार करण्यात आला आहे. येत्या ५ फेब्रुवारीला महाराष्ट्राचे मंत्रिमंडळ अयोध्येत दर्शनाला जाणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह सर्व मंत्री अयोध्येत रामलल्लाचे दर्शन घेणार आहेत तसेच ते शरयू किनारी महाआरतीही करणार आहेत.

# सरकार सकारात्मक; आंदोलन थांबवा!

## मुख्यमंत्री शिंदेंची जरांगे-पाटील यांना विनंती

**सातारा : प्रतिनिधी**

मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांचा मोर्चा बुधवारी (दि. २४) पुण्यात पोहचला आहे. सरकार सकारात्मक आहे, मनोज जरांगे यांनी मुंबईत आंदोलनासाठी येऊ नये, अशी विनंती बुधवारी पुन्हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे.

मराठा समाजाला आरक्षण देण्याची भूमिका स्पष्ट आहे. कुणबी प्रमाणपत्राचे वाटप सुरू आहे. एक लाखापेक्षा जास्त लोक या मराठा आरक्षणासाठी काम करत आहेत. त्रुटी दूर करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. विशेष अधिवेशन घेऊन मराठा समाजाच्या आरक्षणावर निर्णय घेतला जाईल. टिकणारे आरक्षण दिले जाईल, असे मुख्यमंत्री म्हणाले.



मनोज जरांगे पाटील यांना कालही विनंती केली. सरकार सकारात्मक आहे. माझी मराठा समाजाला आणि जरांगे पाटील यांना विनंती आहे, सरकार निगेटीव्ह असतं तर आंदोलनाचा मार्ग योग्य होता. म्हणून आंदोलन टाळले पाहिजे. आतापर्यंत न झालेले काम सरकार करत आहे. त्यांनी सामंजस्याची भूमिका घेतली पाहिजेत. सर्व सामान्यांचे हे सरकार आहे. सरकार ऐकणारे आहे. सर्वांच्या सुट्या रद्द करून हे सरकार कामाला लागले आहे. पूर्ण टिम कामाला लागली आहे. तुम्ही सरकारला सुचना करू शकता, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

### हायकोर्टात हजर राहण्याची नोटीस

दुसरीकडे वकील गुणरत्न सदावर्ते यांनी मनोज जरांगे यांच्या आंदोलनाविरोधात मुंबई हायकोर्टात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर बुधवारी सुनावणी झाली. या वेळी हायकोर्टाने पोलिसांना मनोज जरांगे यांना हायकोर्टात हजर राहण्याची नोटीस पाठवण्याचे आदेश दिले. तसेच आझाद मैदानात पाच हजार पेक्षा जास्त जणांना येता येणार नाही, असे हायकोर्टाने म्हटले. तसेच सरकारने रोड ब्लॉक होणार नाही याची खबरदारी घ्यावी. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बिघडणार नाही याची जबाबदारी घ्यावी, असे हायकोर्ट म्हणाले. या सुनावणीनंतर गुणरत्न सदावर्ते यांनी प्रतिक्रिया दिली.

# मिंधे कोण हे जनता जाणते

## मुख्यमंत्री शिंदेंचे उद्धव ठाकरेंना प्रत्युत्तर

**सातारा : प्रतिनिधी**

मिंधे कोण हे सर्व जनता जाणते, स्वार्थासाठी बाळासाहेबांचे विचार सोडले, असा हल्लाबोल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर सातारा येथे केला. उत्तेश्वर देवाच्या यात्रेसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सातारा जिल्ह्यातील त्यांच्या दरे गावी आले आहेत. मुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांच्या शेतात स्वतः काम करत रोटर फिरवला तसेच हळदीच्या शेतात हळद काढण्याचे काम केले. या वेळी त्यांनी पत्रकारांसोबत संवाद साधला.



दरम्यान, या वेळी बोलताना एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. ते म्हणाले की, लांडग्यांनी वाघाचं कातडं घातलं तरी ते वाघ होत नाहीत वाघ एकच फक्त बाळासाहेब ठाकरे आहेत. त्यांचे हिंदुत्वाचे विचार घेऊन आम्ही पुढे चाललो आहे. बाळासाहेबांचे विचार कोणी सोडले? बाळासाहेबांनी काँग्रेसला दूर ठेवलं. भविष्यात माजी शिवसेना काँग्रेस होईल, त्यावेळी मी माझं दुकान बंद करीन असं त्यांनी सांगितले. ते म्हणाले की, मिंधे कोण हे सर्व जनता जाणते, स्वार्थासाठी बाळासाहेबांचे विचार सोडले. महाराष्ट्रात या भाजप आणि शिवसेना या युतीला निवडून दिले त्यांच्या पाठीत खंजीर खुपसला. मग गद्दारी कोणी केली? अशी विचारणा त्यांनी केली. बाळासाहेबांचे कपडे बाळासाहेबांचे रुद्राक्ष घालून बाळासाहेब होता येत नाही.

ते म्हणाले की, मोदींनी जे बाळासाहेबांचे स्वप्न ३७० कलम, राम मंदीर बनवण्याचे स्वप्न पूर्ण केले त्यांचे आभार मानले पाहिजे होते. त्यांना साष्टांग दंडवत घालायला पाहिजे होता, पण हे काँग्रेसच्या खाली दंडवत घालत आहेत. बाळासाहेबांचे विचार त्यांनी सोडले आहेत, म्हणून त्यांना नैतिक अधिकार नाही. ये पब्लिक है सब जानती है येणाऱ्या निवडणुकीत बेईमानी, मिंधेपणाचं उत्तर जनता देईल.

दरम्यान, केंद्र आणि राज्य सरकार एकत्रित येऊन बुलेट ट्रेनच काम करतंय, असं म्हणत उध्दव ठाकरे यांच्यावर टीका केली. जनता कामाला महत्व देते, शिवडी न्हावा शेवा गेमचेंजर प्रकल्प, समृध्दी महामार्ग असे अनेक प्रकल्प आम्ही केल्याचे एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

### 'केंद्र आणि राज्य सरकार बुलेट ट्रेनच्या वेगाने काम करतेय'

सत्तेत आल्यावर ज्यांनी खिचडी घोटाळा, कफन घोटाळा केला त्यांना आपण खिचडी, कफण चोर म्हणायच का? अशा लोकांना जनता परत सत्ता कशी देणार? घरी बसलेल्या लोकांना कुणी सत्ता देतं का? आम्ही २४X७ काम करतो. मोंदींबद्दल पोटदुखी आहे. मोदी आले की यांची पोट दुखी सुरू होते, केंद्र आणि राज्य सरकार बुलेट ट्रेनच्या वेगाने काम करत असल्याचे ते म्हणाले. जनता कामाला महत्व देते, अनेक प्रकल्प आम्ही केल्याचे एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

# पनवेलमध्ये आज नमो मतदार संमेलन

## पंतप्रधान नरेंद्र मोदी साधणार युवा पिढीशी संवाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त गुरुवारी (दि. २५) जानेवारी रोजी सकाळी ९.३० वाजता पनवेलमध्ये नमो नवमतदार संमेलन आयोजित करण्यात आले आहे. शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणाऱ्या या संमेलनात देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी नव्या मतदार युवा पिढीशी ऑनलाईन संवाद साधणार आहेत.

लोकशाहीत मतदानाच्या अधिकाराचे महत्त्व काय आहे, तो हक्क बजावल्याने काय परिणाम होऊ शकतो, मतदारांची भूमिका कशी महत्त्वाची ठरु शकते याबद्दल नागरिकांमध्ये जागरुकता करण्यासाठी दरवर्षी २५ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिन साजरा केला जातो.जगातली सर्वात मोठी लोकशाही अशी ओळख आपल्या भारत देशाची आहे. आपल्या देशात १८ वर्षे पूर्ण केलेल्या आणि मतदार यादीत नाव असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला मत देण्याचा अधिकार आहे. धर्म, जात, वर्ण, संप्रदाय अथवा लिंग या निकषांवर भेदभाव न करता कुणालाही हा अधिकार बजावता येतो. म्हणूनच मतदार आणि मतदान याला देशात अनन्य साधारण महत्व आहे.

याच अनुषंगाने देशातील युवा पिढी प्रथम मतदान करत असताना त्यांना लोकशाहीच्या महत्वपूर्ण अविभाज्य प्रक्रियेची माहिती व्हावी, त्याने या प्रकियेत स्वयंस्फूर्तीने सहभाग घ्यावा, यासाठी योग्य मार्गदर्शन महत्वाचे आहे. त्या अनुसरून पंतप्रधान नरेंद्र मोदी युवा पिढीला संबोधित करणार आहेत. या संमेलनाचा युवा पिढीने लाभ घ्यावा, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी केले आहे.

# महाराष्ट्र तलाठी भरती परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील बहुचर्चित तलाठी परीक्षेतील उमेदवारांची निवड यादी जाहीर करण्यात आली आहे. महाराष्ट्र महसूल विभागाने तलाठी भरती २०२३ परिक्षेचा अंतिम निकाल जाहीर केला आहे. जे उमेदवार भरती परीक्षेसाठी बसले होते ते mahabhumi.gov.in या अधिकृत वेबसाइटला भेट दऊन त्यांचे निकाल पाहू शकतात. महाराष्ट्र तलाठ्यांची लेखी परीक्षा ३६ जिल्ह्यांमध्ये ५७ शिफ्टमध्ये पार पडली. १,०४१,७१३, नोंदणीकृत उमेदवारांपैकी ८६४,००० (८३.०३ टक्के) परीक्षेत सहभागी झाले होते. २०२३ मधील महाराष्ट्र तलाठ्यांची जिल्हानिहाय गुणवत्ता यादी ५ जानेवारी २०२४ रोजी प्रसिद्ध झाली. निवड मंडळाने आता अंतिम परीक्षेचा निकाल जाहीर केला आहे.

अकोला, बीड, बुलडाणा, छत्रपती संभाजीनगर, धाराशिवा, गोंदिया, हिंगोली, जालना, कोल्हापूर, लातूर, मुंबई, मुंबई उपनगरे, वर्धा आणि वाशिम, नागपूर, परभणी, रायगड, रत्नागिरी, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग, सोलापूर यासह सर्व प्रदेशांसाठीचा तलाठी भरती निकाल २०२३ जाहीर झाला आहे. अधिक माहितीसाठी, उमेदवारांना mahabhumi.gov.in ची अधिकृत वेबसाइट तपासत राहण्याचा सल्ला दिला जातो.

## निवडक

### मुख्यमंत्री ममता बॅनर्जींना कार अपघातात दुखापत

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या कोलकाता येथे मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यासह जात होत्या. या वेळी त्यांच्या कारला अपघात झाला आहे. यामध्ये ममता यांच्या डोक्याला जखम झाली आहे. बर्धमानहून ममता या कोलकाता येथे परतत होत्या. खराब हवामानामुळे कारचालकालाही अचानक ब्रेक मारावे लागले. यामुळे ममता यांचे डोके पुढील डॅशबोर्डवर आदळले. यामुळे ममता यांना दुखापत झाली आहे.

### युक्रेनच्या सीमेवर रशियाचे लष्करी विमान कोसळले

**रशिया :** युक्रेनच्या सीमेजवळ रशियन इल्युशिन Il-७६ लष्करी वाहतूक विमान कोसळले आहे. संरक्षण मंत्रालयाचा हवाला देत RIA या स्थानिक वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार या विमानात युक्रेनियन युद्धकैद्यांना ठेवले होते. या युक्रेनियन युद्धकैद्यांना घेऊन हे विमान बेलग्रूड येथे युक्रेन लष्कराकडे सोपवण्यासाठी घेऊन जात होते. या दरम्यान हा अपघात घडला.

# बोर्डाच्या परीक्षेसाठी आता १० मिनिटे वाढीव



**मुंबई : प्रतिनिधी**

दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची बातमी समोर येत आहे. दहावी-बारावीच्या बोर्डाच्या परीक्षेसाठी आता विद्यार्थ्यांना १० मिनिट वाढीव वेळ मिळणार आहे.

परीक्षेची प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी आणि समजून घेण्यासाठी ही वाढीव वेळ मिळणार आहे. महाराष्ट्र बोर्डाने परिपत्रक काढून याबाबतची माहिती दिली आहे. इयत्ता १० व १२ वीच्या परीक्षा विद्यार्थ्यांच्या जीवनातील एक महत्वपूर्ण टप्पा असल्यामुळे पालक व समाज घटक यांचे या परीक्षांकडे बारकाईने लक्ष असते, परंतु प्रश्नपत्रिका मोबाईलवर तसेच अन्य समाज माध्यमातून व्हायरल झाल्याच्या अफवा व काही अंशी अशा घटना निदर्शनास आलेल्या आहेत.

अशा प्रकारच्या घटनांना प्रतिबंध व्हावा तसेच परीक्षा भयमुक्त आणि कॉपीमुक्त वातावरणात सुरळीत पार पडाव्यात यासाठी परीक्षेच्या निर्धारीत वेळेपूर्वी दहा मिनिटे अगोदर प्रश्नपत्रिका वितरीत करण्याची सुविधा फेब्रुवारी-मार्च २०२३ परीक्षेपासून रद्द करण्यात आलेली होती. तथापि विद्यार्थी हित लक्षात घेवून व पालक, विद्यार्थी यांच्या मागणीचा विचार करून सदरची दहा मिनिटे परीक्षेच्या निर्धारित वेळेनंतर गतवर्षीप्रमाणे फेब्रुवारी-मार्च २०२४ परीक्षांसाठी वेळ वाढवून देण्यात येत आहे.

फेब्रुवारी-मार्च २०२४ परीक्षांची वेळी सकाळ सत्रात सकाळी ११ वाजता वाजता तसेच दुपार सत्रात दुपारी ३ वाजता परीक्षा दालनात प्रश्नपत्रिकांचे वितरण करण्यात येईल व लेखनास प्रारंभ होईल. सकाळ सत्रात सकाळी १०.३० वाजता तसेच दुपार सत्रात दुपारी २.३० वाजता परीक्षार्थ्यांने परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे. सकाळच्या सत्रामधील ११ ते २.१०, ११ ते १.१०, ११ ते १.४० अशी वेळ असणार आहे. तर दुपारच्या सत्रातील ३ ते ६.१०, ३ ते ५.१०, ३ ते ५.४० अशा प्रकारे सर्व पेपरसाठी वेळ १० मिनिटे वाढवून देण्यात आली आहे.

# नमो चषक अंतर्गत आज तायक्कांदो स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**




देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्याला सलाम करण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल विधानसभा क्षेत्रात भव्य कला, क्रीडा व सांसकृतिक महोत्सव नमो चषक २०२४ आयोजित करण्यात आला आहे. या अंतर्गत गुरुवारी (दि.२५) कामोठ्यात नमो चषक तायक्कांदो स्पर्धा होणार आहे.

कामोठे येथील सुषमा पाटील विद्यालय व ज्युनिअर कॉलेज येथे होणाऱ्या या स्पर्धेचे आयोजक म्हणून सुभाष पाटील, सुरेंद्र हल्लीकर, नंदलाल भोपी, अमोल बिनावडे व सहकाऱ्यांवर जबाबदारी आहे. अधिक माहितीसाठी सुरेंद्र हल्लीकर (९९८७२९४१५४) किंवा सुभाष पाटील (९८२१६५०४४४) यांच्याशी संपर्क साधावा.

## आमदार रोहित पवारांची 'ईडी'कडून चौकशी

**मुंबई : प्रतिनिधी**

बारामती ॲग्रो कंपनीसंबंधित प्रकरणात चौकशीच्या फेऱ्यात अडकलेले राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांची ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयाने बुधवारी (दि.२४) तब्बल १२ तास आपल्या कार्यालयात चौकशी केली.

'बारामती ॲग्रो' गैरव्यवहारप्रकरणी मुंबईसह सहा ठिकाणी ईडीने छापेमारी केली होती. ही कंपनी आमदार रोहित पवार यांच्या मालकीची आहे. याच संदर्भात त्यांना चौकशीला हजर राहण्याचे आदेश दिले होते.

## मंत्री उदय सामंत यांची तब्येत बिघडली

### रुग्णालयात दाखल

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेना नेते आणि उद्योग मंत्री उदय सामंत यांच्यासंदर्भात महत्त्वाची अपडेट समोर येतेय. उदय सामंत यांना तात्काळ मुंबईतील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



उदय सामंत यांना अचानक उच्च रक्त दाबाचा त्रास जाणवू लागला. यानंतर त्यांना तत्काळ मुंबईतील लिलावती हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. येथे त्यांच्यावर उपचार सुरु असल्याची माहिती सुत्रांनी दिली. समोर आलेल्या माहितीनुसार सध्या उदय सामंत यांची प्रकृती स्थिर असून ते लवकरच बरे होतील असे डॉक्टरांनी सांगितले आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण

## खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचा वार्षिक समारंभ

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात बुधवारी (दि २४) वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. समारंभाचे अध्यक्ष संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उपस्थित राहुन त्यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके व प्रमाणपत्र, विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या.



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी यावेळी महाविद्यालयाचा वार्षिक अहवाल-२०२३-२४ सादर केला सर्व मान्यवरांच्या हस्ते वार्षिक अहवालाचे प्रकाशन करण्यात आले. या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सीए डॉ. गजानन वडेर चेअरमन बोर्ड ऑफ स्टडीज अकाउंटन्सी, सिनेट मेंबर अॅकडमी कौन्सिल व आरआरसी मेंबर मुंबई विद्यापीठ, प्राचार्य पिल्लई आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय न्यू पनवेल यांनी उपस्थित राहुन विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन केले व त्यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके व प्रमाणपत्र दिली.

या वेळी संस्थेचे संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे, भाजप खारघर अध्यक्ष व माजी नगरसेवक प्रवीण पाटील, रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निशा नायर, वसंत पाटील, रामशेठ ठाकूर महाविद्यालय सीडीसी मेंबर प्रभाकर जोशी, दीपक शिंदे आदी उपस्थित होते. **(पान २ वर..)**

# आज 'मुंबई वॉक'

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाचा पर्यटन विभाग आणि मुंबई फेस्टिव्हल समितीमार्फत सध्या 'मुंबई फेस्टिव्हल २०२४'चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाअंतर्गत गुरुवारी (दि. २५) 'मुंबई वॉक'चे गेट वे ऑफ इंडिया येथे रात्री ६ ते १० या वेळेत आयोजन केले आहे.

या कार्यक्रमाला पर्यटन मंत्री गिरीश महाजन, पर्यटन सचिव जयश्री भोज, पर्यटन संचालक डॉ.बी.एन.पाटील यांची उपस्थित राहणार आहे. 'मुंबई वॉक' हे मुंबई फेस्टिव्हलच्या वैशिष्ट्यपूर्ण वैशिष्ट्यांपैकी एक आहे. या वॉकद्वारे मुंबईची गती कायम ठेवणारे खरे हिरो मुंबईचे डबेवाले, पोलीस हवालदार, बेस्ट बस ड्रायव्हर आणि कंडक्टर, सफाई कामगार, सफाई कर्मचारी यांचा सत्कार करण्यात येणार आहे. या वेळी अभिनेत्री दिया मिर्झा, शेफ संजीव कुमार, कपिल शर्मा, अभिनेत्री रकुल प्रीत सिंग यांची या कार्यक्रमाला उपस्थिती आहे. गायक अवधुत गुप्ते, पंकज त्रिपाठी, अमृता फडणवीस यांचा संगीताचा कार्यक्रम आयोजित केला आहे.

# अयोध्येतील राम मंदिराबाबत पंतप्रधानांच्या केंद्रीय मंत्र्यांना सूचना

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राम मंदिरातील प्राणप्रतिष्ठा आणि त्यानंतर रामदर्शनासाठी अयोध्येत भाविक दाखल झाले आहेत. मंदिराकडे जाणारा रामपथ भाविकांच्या गर्दीने पहाटेपासूनच ओसंडून वाहत होता. मुख्य प्रवेशाद्वाराजवळ रेटारेटीसदृश्य स्थिती होती, तर आता दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्रीय मंत्र्यांना अयोध्येत न जाणाच्या सूचना केल्या आहेत. फ्री प्रेसने सूत्रांच्या हवाल्याने हे वृत्त आहे.



केंद्रीय मंत्रिमंडळाची बुधवारी (दि. २४) बैठक झाली. या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अयोध्येतील राम मंदिरात न जाण्याचा सल्ला दिला आहे. अयोध्येत राम मंदिरात प्राणप्रतिष्ठा सोहळ्या झाल्यापासून गर्दीने उच्चांक गाठला आहे. त्यातच व्हीआयपी नेते तिथे गेल्यास प्रोटोकॉलमुळे गर्दीत भर पडेल. परिणामी भाविकांना अडचण निर्माण होऊ शकते. त्यामुळे केंद्रीय मंत्र्यांनी मार्चमध्ये अयोध्या दौरा निश्चित करावा, अशा सूचना पंतप्रधान मोदींनी दिल्या आहेत.

२२ जानेवारी रोजी राम मंदिरात भगवान रामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. या ऐतिहासिक सोहळ्याकरिता देशभरातून भाविक अयोध्येत दाखल झाले होते तसेच दुसऱ्या दिवशी म्हणजेच २३ जानेवारी रोजी सकाळी ६ वाजल्यापासून भाविकांना राम मंदिर संकुल परिसरात प्रवेश देण्यास प्रारंभ झाला. दिवसअखेरपर्यंत सुमारे पाच लाख भाविकांनी मंदिर संकुलाला भेट दिल्याचा अंदाज अधिकाऱ्यांनी व्यक्त केला. राम मंदिर संकुल परिसरात आठ हजारांहून अधिक पोलीस तैनात करण्यात आले आहेत. हे भाविक प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या आधीच अयोध्येत दाखल झाले आहेत. मोठमोठ्या बॅगा, सुटकेस आणि अन्य साहित्यामुळे रामपथावर लोकांची कोंडी झाल्याचे चित्र होते.

भाविकांची प्रचंड गर्दी पाहता बाराबंकी पोलिसांनी रामभक्तांना पुढे न जाण्याचे आवाहन केले आहे. अयोध्या ते बाराबंकी हे अंतर सुमारे १०० किलोमीटर आहे. पोलिसांनी लोकांना यापुढे न जाण्याचे आवाहन केले आहे.

# धुळ्यातील काँग्रेसचे कार्यकर्ते भाजपमध्ये




**मुंबई : प्रतिनिधी**

जळगाव चे माजी खासदार आणि काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.उल्हास पाटील, डॉ.केतकी पाटील, धुळे जिल्ह्यातील बाळासाहेब भदाणे यांच्यासह काँग्रेस, उबाठा गटातील अनेक सरपंच, कार्यकर्त्यांनी बुधवारी (दि. २४) भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला.

प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, ग्रामीण विकास मंत्री गिरीश महाजन, खा. डॉ. सुभाष भामरे, आ. जयकुमार रावल, आ. मंगेश चव्हाण, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, विक्रांत पाटील, जळगाव महानगर जिल्हाध्यक्ष उज्वला बेंडाळे, रावेर ग्रामीण अध्यक्ष अमोल जावळे आदी यावेळी उपस्थित होते.

भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केलेल्या नेत्यांच्या, कार्यकर्त्यांच्या विकास कामांचे प्रस्ताव तातडीने मार्गी लावले जातील, असे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी या वेळी जाहीर केले. प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी या वेळी सांगितले की, मोदी सरकारने भारताचे नाव जगात उंचावले आहे. भारताला क्रमांक एकचा देश बनविण्याचा संकल्प केला आहे. अशा नेत्यांच्या हाताखाली काम करायला मिळणे हे सर्व कार्यकर्त्यांचे भाग्य आहे. राज्यातील महायुतीचे सरकारही राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील आहे. नरेंद्र मोदी यांच्या कणखर नेतृत्वामुळेच डॉ. उल्हास पाटील यांच्यासारख्या ज्येष्ठ, जाणत्या काँग्रेस नेत्याने भारतीय जनता पक्षाच्या प्रवाहात सामील होण्याचा निर्णय घेतला आहे.

भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केलेल्या सर्व नेत्यांचा, कार्यकर्त्यांचा पक्षात यथोचित सन्मान केला जाईल असेही श्री. बावनकुळे यांनी सांगितले. ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी डॉ. उल्हास पाटील यांच्या शैक्षणिक, वैद्यकीय क्षेत्रातील योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. डॉ.पाटील यांच्या प्रवेशामुळे भारतीय जनता पार्टी आणखी बळकट होईल आणि उत्तर महाराष्ट्रात यापुढील काळात आणखी पक्ष प्रवेश होतील, असेही श्री. महाजन यांनी नमूद केले. डॉ. केतकी पाटील यांची भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती केल्याचे प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी जाहीर केले. जळगाव मधील डॉ. वर्षा पाटील, देवेंद्रभैय्या मराठे, संदेश पाटील , पुंजाजी पाटील, सुरेंद्र कोल्हे, राजू राणे आदींसह काँग्रेसच्या शेकडो कार्यकर्त्यांनी भाजपा मध्ये प्रवेश केला.

धुळे जिल्ह्यातील ६७ सरपंचांनी बाळासाहेब भदाणे यांच्या नेतृत्वाखाली भाजपामध्ये प्रवेश केला. जिल्हा परिषदेचे माजी सदस्य प्रभाकर भदाणे, बापजी आदिवासी संघटनेचे अध्यक्ष भरत जाधव, धुळे तालुका काँग्रेसचे कार्याध्यक्ष अशोक सुडके, अनिल कचवे आदींचा त्यात समावेश आहे.

# हिंदू धर्म संपवण्याची भाषा करणारे व्यक्ती उद्धव ठाकरेंना मान्य आहेत का?

## भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा सवाल

**मुंबई : प्रतिनिधी**

सनातन हिंदू धर्माला संपवण्याची उद्दाम भाषा करणाऱ्या उदयनिधी स्टॅलिन यांच्यासोबत इंडी आघाडीमध्ये रहाणे उद्धव ठाकरे यांना मान्य आहे का, असा परखड सवाल भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी (दि. २४) केला.




तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के स्टॅलिन यांचे सुपूत्र क्रीडा मंत्री उदयनिधी स्टॅलिन हे सनातन हिंदू धर्माला संपवण्याची उद्दाम भाषा वारंवार करत आहेत. या विचारावरच जी इंडी आघाडी तयार झाली त्या आघाडीत हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे सुपुत्र उद्धव ठाकरे सहभागी आहेत. उदयनिधींची सनातन हिंदू धर्माबद्दलची मते तुम्हाला मान्य आहेत का हे उद्धव ठाकरे यांनी जाहीर करावे असे आव्हानही श्री. बावनकुळे यांनी या वेळी दिले. भाजप प्रदेश कार्यालयाबाहेर प्रसिद्धीमाध्यमांच्या प्रतिनिधींशी श्री. बावनकुळे बोलत होते. या वेळी भाजप प्रदेश सहमुख्य प्रवक्ते आशिष देशमुख, नव्याने पक्ष प्रवेश केलेले जळगावचे काँग्रेसचे माजी खासदार डॉ. उल्हास पाटील उपस्थित होते.

श्री. बावनकुळे म्हणाले की, ज्यांनी मुख्यमंत्रीपदासाठी हिंदुत्ववादी विचारांना मूठमाती दिली, घराणेशाही नुसार मुख्यमंत्री असताना स्वतःच्या मुलाला मंत्री केले त्यांना पंतप्रधान मोदी यांच्यावर, भाजपावर टीका करण्याचा अधिकारच नाही. उद्धव ठाकरे यांच्या हातातून सत्ता, पक्ष, कार्यकर्ते सगळेच निसटले. उद्धव यांच्या नाकर्तेपणामुळे पक्षाची अशी दयनीय अवस्था झाली आहे. म्हणूनच अस्वस्थ, विचलित मानसिक अवस्थेत उद्धव यांनी नाशिक इथे मोदीजी आणि भाजपा विरोधात गरळ ओकली असे श्री. बावनकुळे म्हणाले.

इंडी आघाडीमध्ये ममता बॅनर्जी यांच्या पवित्र्यामुळे फूट पडल्याचे दिसून आले आहे. आगामी काळात एकीकडे इंडी आघाडीची शकले होताना दिसतील तर दुसरीकडे महाराष्ट्रात भाजप मध्ये पक्षप्रवेशाचा झंझावात दिसून येईल, असेही श्री. बावनकुळे यांनी नमूद केले.

# जिल्हास्तरीय राष्ट्रीय मतदार दिवस

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्हास्तरीय राष्ट्रीय मतदार दिवसाचे गुरुवारी (दि.२५) सकाळी ११ वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय आवार येथे आयोजन करण्यात आले, असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी तथा उप जिल्हानिवडणूक अधिकारी श्रीमती स्नेहा उबाळे यांनी दिली आहे.

मा.भारत निवडणूक आयोग व मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशाप्रमाणे दरवर्षी प्रमाणे दि. २५ जानेवारी २०२४ रोजीच्या १४ व्या राष्ट्रीय मतदार दिवसाकरिता Nothing like voting. I vote for sure हा विषय (Theme) आयोगाकडून देण्यात आला आहे. मतदार नोंदणी अधिकारी कार्यालय अलिबाग व निवडणूक साक्षरता मंडळ जे.एस.एम कॉलेज अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

दि. २५ जानेवारी १९५० रोजी भारत निवडणूक आयोगाची स्थापना झाली. भारत निवडणुक आयोगाचा हा स्थापना दिवस २०११ पासून संपूर्ण देशभरात राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा केला जातो. राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्याचा मुख्य उद्देश हा मतदारांना, विशेषतः नवमतदारांना समर्पित केलेल्या या दिवसाचा उपयोग मतदारांचा निवडणुक प्रक्रियेतील सहभाग वाढावा म्हणून त्यांना जागरुक करण्यासाठी केला जातो.

# बेशिस्त प्रवाशांविरोधात मध्य रेल्वेची धडक मोहीम

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेचा मुंबई विभाग उपनगरीय, मेल एक्स्प्रेस, प्रवासी आणि विशेष गाड्यांमध्ये विनातिकीट आणि अनियमित प्रवासाला आळा घालण्यासाठी सखोल तिकीट तपासणी करते. सर्व प्रामाणिक रेल्वे वापरकर्त्यांना आरामदायी प्रवास आणि उत्तम सेवा प्रदान करते. विनातिकीट प्रवास आणि अशा इतर अनियमिततेमुळे होणाऱ्या महसुलावर वरिष्ठ अधिकारी बारकाईने लक्ष ठेवून आहेत.

अनियमित प्रवासाला आळा घालण्यासाठी नियमितपणे वेगवेगळ्या प्रकारच्या तपासण्या केल्या जातात, ज्यात ॲम्बुश चेक, फोर्ट्रेस चेक, इंटेन्सिव्ह चेक, स्पेशल वातानुकूलित लोकल चेक आणि मेगा तिकीट चेकिंग ड्राईव्ह यांचा समावेश होतो.

मध्य रेल्वे मुंबई विभागात २० जानेवारी २०२४ पर्यंत आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये अनियमित प्रवासाची एकूण १.८५ लाख प्रकरणे (विनातिकीट आणि अनियमित तिकिटे आणि बुक न केलेल्या आणि सामानाच्या अनियमित बुकिंगच्या प्रकरणांसह) नोंदवण्यात आली आहे. ही आकडेवारीपेक्षा ६१.६५% जास्त आहे मागील वर्षी याच कालावधीत १.१४ लाख प्रकरणे होती. यातून रु.७.४३ कोटी महसूल मिळाला आहे जो मागील वर्षीच्या याच कालावधीतील रु.४.२० कोटीच्या तुलनेत ७६.७०% अधिक आहे.

एप्रिल-२०२३ ते २० जानेवारी २०२४ या कालावधीत वातानुकूलित लोकलमध्ये सखोल तिकीट तपासणी मोहिमेमुळे एकूण ३३,८५१ प्रकरणे शोधण्यात मदत झाली, जी मागील वर्षीच्या याच कालावधीत २२,१३२ प्रकरणांच्या तुलनेत ५२.९५% वाढली आहे. महसूल म्हणून मिळालेली रक्कम २०२३-२४ मध्ये रु. १.१२ कोटी आहे जी मागील वर्षी रु. ७४.४९ लाखांच्या तुलनेत ५०.६०% नी वाढली आहे.

१ ते २० जानेवारी २०२४ या कालावधीत, विनातिकीट आणि अनियमित तिकीटांची एकूण १७,८४७ प्रकरणे आणि सामानाचे बुक न केलेले आणि अनियमित बुकिंग आढळून आले आणि दंड म्हणून रु.५९.२४ लाखांचा वसूल करण्यात आला. यामध्ये वातानुकूलित लोकलमध्ये विनातिकिट प्रवासाची २३२७ प्रकरणे आणि दंड म्हणून ७.८९ लाख रुपये जमा झाले. प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी आणि सन्मानाने प्रवास करण्यासाठी मध्य रेल्वे प्रवाशांना वैध रेल्वे तिकिटांसह प्रवास करण्याचे आवाहन करीत आहे.

# ऐरोलीत २०१ किलो मोतिचूर लाडूंचे वाटप



**नवी मुंबई : बातमीदार**

ऐरोली से. ४ मधील चौकात अयोध्येतील श्रीराम प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यानिमित्त भाजपच्या वतीने २०१ किलो मोतिचूर लाडूंचे वाटप करण्यात आले. या वेळी फटाक्यांची मोठ्या प्रमाणात आतषबाजी करण्यात आली होती. यावेळी तीस फुटी प्रभू श्रीरामाचे अधिष्ठान उभारले होते.

लाहानग्यांनी प्रभू श्री राम, सीता माता, लक्ष्मण, हनुमानाची वेशभूषा केली होती. त्यांना पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती.नेते वैभव नाईक यांच्या हस्ते लाडूचे वाटप करण्यात आले.

भाजप प्रदेश कामगार मोर्चाचे प्रदेश सचिव ॲड. गणेश देशमुख, निकेतन पाटील, चारुदत्त ठाणांबीर यांच्या वतीने आयोजन करण्यात आले होते. रबाळे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक भागूजी औटी, माजी नगरसेवक राजू पाटील, सुजित न्यायनिर्गुणे, अतुल देशमुख, चेतन पाटील, कांदळवन अधिकारी प्रशांत बहादुरे, विक्रांत खाडे, प्रमोद सावंत, नवी मुंबई उपजिल्हा प्रमुख वैद्यकीय कक्ष प्रमोद सावंत, किशोर जोनव, सोमेश्वर बडे, अजय पाटील, केशव चनाव, प्रवीण कांबळे, राजू गायकवाड, निलेश कांबळे आदी उपस्थित होते.

# नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातर्फे विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय व हेल्थ सायन्स मधील विद्यार्थ्यांना नवी मुंबई पोलीस आयुक्तालया कडून अंमली पदार्थ सेवनाचे शारिरिक दु:ष परिणाम कसे होतात याचे व्याख्यान देण्यात आले. तसेच इंटरनेटच्या विश्वात सायबर गुन्हे कसे घडतात याचे चित्रफित दाखवून विद्यार्थ्यांनी त्यापासून सावध रहावे या करिता मार्गदर्शन केले गेले.




या वेळी विविध स्पर्धा घेवून महिला दक्षता कक्षामार्फत मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाकरिता संस्थेचे अध्यक्ष डॉ. विजय डी. पाटील, प्रो. चान्सलर शिवानी पाटील यांचे सहकार्य लाभले त्याप्रसंगी वपोनि अतुल अहेर, अनैतिक मानवी वाहतूक, गुन्हे शाखा, निरज चौधरी (वरिष्ठ पोलिस निरिक्षक अमंली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा), मंदाकिनी चोपडे (सहाय्यक पोलीस निरिक्षक, गुन्हे शाखा), स्नेहा आधे (पोलीस उपनिरिक्षक, महिला कक्ष), सुदर्शन सारंग (अंमलदार, सायबर कक्ष), डॉ. राजीव राव (अधिष्ठाता वैद्यकिय महाविद्यालय), डॉ. प्रकाश रोपलेकर (डायरेक्टर, अलायड् हेल्थ सायन्स), उमेश पाटील (रजिस्टारर वैद्यकिय महाविद्यालय), डॉ. दिपाली विधाते, डॉ. स्नेहा जॉन व शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# पोलीस मुख्यालय मैदानावर उद्या ध्वजारोहण

**रायगड :** भारताच्या ७५ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त रायगड जिल्ह्यातील मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ शुक्रवारी (दि. २६) महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते अलिबाग पोलीस मुख्यालय मैदान येथे सकाळी ९.१५ वाजता होणार आहे.

तरी नागरिकांनी, प्रसारमाध्यम प्रतिनिधींनी या समारंभासाठी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# महाराष्ट्राच्या खेळाडूंचे ‘खेलो इंडिया’मध्ये यश

**चेन्नई : वृत्तसंस्था**

गतविजेत्या महाराष्ट्राच्या खेळाडूंनी लौकिकास साजेशी कामगिरी करताना खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेतील सहाव्या पर्वातही सलग तिसऱ्या दिवशी पदकांची लयलूट केली.

भविष्यातील मेरी कोम असलेली पुण्याची आंतरराष्ट्रीय बॉक्सर देविका घोरपडे, जिम्नॅस्टिकमध्ये आर्यन दवंडे व शताक्षी टक्के, सायकलिंगमध्ये पुण्याचा वेदान्त जाधव, धावपटू सिया सावंत, मल्लखांबमध्ये शार्दूल ऋषिकेश, मृगांक पाथरे व सई शिंदे या खेळाडूंनी सुवर्णपदकावर आपले नाव कोरून बुधवारचा दिवस गाजविला. पदकतक्त्यात अव्वल स्थानी असलेल्या महारष्ट्राने २५ सुवर्णपदकांना गवसणी घालून सुवर्ण यशाचा रौप्यमहोत्सव साजरा केला.

मुलींच्या शंभर मीटर्स धावण्याच्या शर्यतीत महाराष्ट्राच्या सिया सावंत हिने १२.१० सेकंदात शर्यत जिंकून वेगवान धावपटूचा बहुमान मिळविला. शार्दूल ऋषिकेश वैयक्तिक सर्वसाधारण विजेतेपदा पाठोपाठ टांगत्या मल्लखांब प्रकारात सुवर्णपदक जिंकून दुहेरी धमाका केला. बॉक्सिंगमध्ये देविका घोरपडे हिने अंतिम लढतीत हरयाणाच्या निधीला सहज पराभूत करताना ५०-५२ किलो वजनी गटात सुवर्णपदक मिळविले. महाराष्ट्राच्या खेळाडूंनी जिम्नॅस्टिक्समध्ये शेवटच्या दिवशीही वर्चस्व गाजवित मुले व मुली या दोन्ही गटात सर्वसाधारण विजेतेपद पटकाविण्याचा पराक्रम केला.

महाराष्ट्र संघाने सायकलिंगमध्ये मुलांच्या गटात सर्वसाधारण विजेतेपदाला गवसणी घातली, मुलींच्या गटात उपविजेतेपद मिळविले. सायकलिंगच्या कयरिंग या प्रकारात पुण्याच्या वेदान्त जाधवने सुवर्णपदक प्राप्त केले. मुलींच्या टीम इव्हेंट प्रकारात महाराष्ट्र संघाने रौप्यपदकाची कमाई केली. तामिळनाडू संघाने अंतिम लढतीत महाराष्ट्र संघाला पराभूत केले. निरुपमा दुबे, अनिका दुबे, रीवा निंबाळकर व अलिना शहा यांच्या संघाने प्रथमच रौप्यपदकापर्यंत मजल मारली. वैयक्तिक प्रकारामध्येदेखील काल निरुपमा दुबेने रौप्यपदकाची कमाई केली होती. तलवारबाजीतील साब्रे टीम इव्हेंट या प्रकारात १७ वर्षांखालील मुलांच्या संघाने कांस्यपदकाची कमाई केली आहे. या संघात शिरीष अंगळ, हर्षवर्धन औताडे, मयूर ढसाळ व स्पर्श जाधव यांचा समावेश आहे. या संघाला अजय त्रिभुवन अजिंक्य दुधारे यांचे मार्गदर्शन लाभले.

## दुखवटा

### व्ही. डी. पाटील

**पनवेल :** तालुक्यातील नेरेगाव येथे राहणारे ज्येष्ठ पत्रकार व्ही. डी. पाटील (वय ८२) यांचे मंगळवारी (दि. २३) निधन झाले.



व्ही. डी. पाटील यांना संपूर्ण गाव आण्णा म्हणून ओळखायचे. ते पेण तालुक्याचे रहिवाशी असले तरी नेरे या गावी राहून गेली ५० वर्ष ते निर्भीडपणे पत्रकारिता करत असत. त्यांनी अनेक वृत्तपत्रात वृतलेखन करुन अन्यायाविरुद्ध सतत लढा देत होते. नेरे येथील वैकुंठ धाम स्मशान भूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यावेळी भाजप नेते संजय पाटील, सरपंच प्रकाश घाडगे, माजी उपसरपंच शंकर ठाकूर आदींनी श्रद्धांजली अर्पण केली.

### प्रभावती कळमकर

**खालापूर :** पत्रकार मनोज कळमकर यांच्या मातोश्री प्रभावती मधुकर कळमकर (वय ८२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.



त्यांच्या पश्चात दोन मुलगे, सूना,एक मुलगी, जावई, पणतू असा मोठा परिवार आहे. कै. प्रभावती यांचा दशक्रिया विधी सोमवारी (दि. २९) होणार असून उत्तरकार्य १ फेब्रुवारीला राहत्या घरी खालापूर येथे होणार आहे.

पान १ वरुन

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण

या पारितोषिक वितरण समारंभासाठी महाविद्यालयात वेगवेगळ्या विभागातील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनी तसेच विजेते व त्यांचे पालक ही या समारंभासाठी उपस्थित होते. या दिवसाचे औचित्य साधत सांस्कृतिक विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनी वेगवेगळी नृत्ये व गीते सादर करून उपस्थित मान्यवरांना त्यांच्या कलेने मंत्रमुग्ध केले.

या पारितोषिक वितरण समारंभाचे सूत्रसंचालन प्रा. अंकिता जांगिड व नम्रता पारीक व महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागातील विद्यार्थी व विद्यार्थ्यांनीनी केले व कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांचे आभार डॉ. दीपिका हसीजी समन्वयक सांस्कृतिक समिती यांनी केले.

# जगद्गुरू नरेंद्राचार्य यांचा समस्या, मार्गदर्शन व दर्शन सोहळा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

अनंत श्री विभूषित जगद्गुरू रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराज यांचा समस्या, मार्गदर्शन व दर्शन सोहळा आणि उपासक व साधक दीक्षा समारंभ जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थान, उपपीठ मुंबई यांचा वसई येथे झाला. या धार्मिक सोहोळ्यासाठी नवी मुंबईतील सत्संग सेवा केंद्र आणि महाराष्ट्रातील विविध सेवा केंद्रातून हजाराच्या संख्येने भक्तगण उपस्थित राहिले होते.

सध्याच्या धावपळीच्या युगात माणूस यंत्रवत बनत चालला आहे. मन शांती नाही, समाधान नाही, संस्कृतीचा हास होत चालला आहे. या सर्व बाबी लक्षात घेऊन जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज यांच्या प्रवचन व दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. प.पू. स्वामी यांनी आपल्या प्रवचनातून सकारात्मक ऊर्जा वाढविणे, संयम पाळणे, समय सुचकता, नेतृत्वगुण, परिपक्वता, चिकाटी, दूर दृष्टीकोन या विषयावर मार्गदर्शन केले .



श्रीक्षेत्र मोफत अन्नदान सेवा, मोफत इंग्रजी माध्यमाची शाळा उपक्रम, कृषी साठी अत्यावश्यक उपक्रम तसेच आर्थिक मदत अशा अनेक उपक्रम संस्थानांमार्फत राबविले जातात.

## संपादकीय

# हवा संवादाचा पूल

मराठा आरक्षणासाठी राज्य सरकारने सुरू केलेले सर्वेक्षण आणि विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलावण्याबाबत दिलेले आश्वासन लक्षात घेऊन मनोज जरांगे-पाटील यांनी दोन पावले माघार घ्यायला हवी होती. अशा प्रकारची माघार पराभव मानण्याचे कारण नसते, परंतु या साऱ्याचा कुठलाही विचार न करता जरांगे यांनी मराठा समाजाचा विशाल मोर्चा मुंबईच्या दारापर्यंत आणला आहे. मराठा आंदोलक आणि सरकार या दोन्ही पक्षांनी खरेतर संवाद वाढवण्याकडे लक्ष द्यायला हवे.

**मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली निघालेला मोर्चा मुंबईच्या वेशीवर येऊन ठेपला आहे. गेले काही महिने जरांगे-पाटील यांनी मराठा आरक्षण प्रश्नी राज्यभर वादळ उभे केले आहे. त्यांना मिळणारा उदंड प्रतिसाद लक्षणीय मानला पाहिजे. विशेष म्हणजे मराठा समाजाला आरक्षण मिळावे असे सर्वांनाच वाटते. राज्यात असा एकही राजकीय पक्ष नाही की, ज्याला मराठा समाजावर अन्याय व्हावा असे वाटते. देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकीर्दीत मराठा आरक्षणाची लढाई जवळपास जिंकली होती. फडणवीस हेच सध्या महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आहेत आणि गृहमंत्रीपदाची जबाबदारीही त्यांच्याकडेच आहे. सध्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तर मराठा आरक्षणासाठी हातात कंकणच बांधले आहे. रक्ताच्या अखेरच्या थेंबापर्यंत मराठा समाजासाठी संघर्ष करण्यासाठी प्रतिज्ञाच त्यांनी घेतली आहे. दुसरीकडे ओबीसी समाजाचे हित जपण्यासाठी मैदानात उतरलेले ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनीही आपण मराठा आरक्षणाच्या विरोधात नसल्याचे वारंवार स्पष्ट केले आहे. या प्रश्नी सर्वपक्षीय राजकारण्यांचा पाठिंबा असूनही मनोज जरांगे-पाटील यांना ही पायी यात्रा का काढावीशी वाटली हाच खरा प्रश्न आहे. खरेतर राज्य सरकारने मराठा आरक्षणासाठी व्यापक सर्वेक्षण हाती घेतले असून मंगळवारपासून त्याची धडाक्यात सुरुवातदेखील झाली. या सर्वेक्षणाचा तपशील आठवड्याभरात हाती येईल अशी अपेक्षा आहे. त्यानंतर याच विषयावर फेब्रुवारी महिन्यात राज्य विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलावण्याचे आश्वासनही सरकारने जरांगे यांना दिले आहे. तरीही जरांगे यांनी आपला आक्रमक पवित्रा सोडलेला नाही. मुंबईतील ऐतिहासिक आझाद मैदानावर ठाण मांडण्याचा निर्णयावर ते ठाम आहेत. एकीकडे राज्य सरकारने बच्चू कडू आणि अन्य काही नेत्यांमार्फत जरांगे यांच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न सुरूच ठेवला असला तरी जरांगे आणि मराठा नेते मात्र सरकारची कोंडी करण्याच्या मन:स्थितीत आहेत असे दिसते. वास्तविक, आंदोलकांच्या मागणीनुसार मराठा समाजाला सरसकट आरक्षण देणे हे केवळ सरकारच्या हातात नाही हे साऱ्यांनाच ठाऊक आहे. तरीही जरांगे यांनी मी असो वा नसो आंदोलन सुरूच ठेवा असे भावनिक आवाहन करून लढा सुरू ठेवला आहे. बुधवारी पहाटे सरकारतर्फे जरांगे यांना तीन कलमी प्रस्ताव सादर करण्यात आला होता, परंतु तो त्यांनी तडकाफडकी फेटाळला. धमक्या आणि इशारे हा संवादाचा भाग असू शकत नाही. लोकशाही व्यवस्थेत तर मुळीच नाही हे आंदोलकांनी ध्यानी घेतलेले बरे. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयात या संबंधात दाखल करण्यात आलेल्या क्युरेटिव्ह पेटिशनची सुनावणी बुधवारीच पूर्ण झाली असून निकाल राखून ठेवण्यात आला आहे. हा निकाल येईपर्यंत तरी जरांगे यांनी आपला आक्रमक पवित्रा बाजूला ठेवून तूर्त आंदोलन स्थगित करणे इष्ट ठरेल.**

# आपत्ती निवारण कक्षाला बदल माहीत हवेत!

पोलादपूर तालुक्यामध्ये २८ एप्रिल २०१९ रोजी कोकणातील सर्वाधिक तापमानाची नोंद लोहारमाळ येथे ४४.५ सेल्सीयस इतकी झाल्याचे ॲपवरून सर्वांना लक्षात आले, मात्र तहसील कार्यालयामधील आपत्ती निवारण कक्षाला याबाबत काहीही माहिती नव्हते. शनिवारपासून सोमवारपर्यंत मोरगिरी येथे व्हेरी अनहेल्दी वातावरण असल्याचे नोटीफिकेशन प्रसिद्ध होऊनही आपत्ती निवारण कक्षाला काहीही माहिती नव्हते. अनेकदा दरडप्रवण क्षेत्रामध्ये दरड कोसळेल म्हणून प्राथमिक शाळा किंवा सामाजिक सभागृह अथवा मंदिरामध्ये हलविण्यात येते आणि दरडप्रवण क्षेत्रातच या इमारती असल्यामुळे अनेकांचे जीव धोक्यात येतात.




आपत्ती निवारणासाठी यंत्रणांना मेसेज प्राप्त झाल्यानंतर यंत्रणांनी आपत्ती आल्यानंतर निवारणाची तयारी करायची अथवा आपत्ती येण्यापुर्वीच सावधगिरी बाळगायची अथवा जनतेला सावध करायचे, याबाबत कोणत्याही प्रकारची योग्य सूचना प्रशासनास प्राप्त झालेली नसते.

मुंबई-गोवा महामार्ग चौपदरीकरणासाठी वृक्षतोड, मोबाईल टॉवर्सची वाढलेली संख्या आणि नदीपात्रात भराव यामुळे तालुक्यात यंदा तापमानवाढीचा फटका सर्वसामान्यांना बसला आहे. रविवारी लोहारमाळ येथे कोकणातील सर्वाधिक ४४.५ अंश तापमानाची नोंद झाली असून तालुक्यात अन्यत्रदेखील तापमान ४२ अंशांपर्यंत वाढलेले दिसून आले.

नदीच्या उथळ पात्रातील उष्णतेचा अनुभव या भरावाच्या दगड गोट्यांमुळे आता रस्त्याचे तापमान वाढून लोकवस्तीमध्येही तापमानवाढीचा अनुभव घ्यावा लागत आहे. सुर्याच्या प्रखर उष्णतेचे प्रसारण करणारी लालमातीही या भरावासाठी वापरण्यात आली असून या मातीची धूळ सर्वत्र उडू नये यासाठी टँकरद्वारे पाणी मारले गेल्यानंतर हवेतील उष्मा वाढत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

पोलादपूर शहरामध्ये मोबाईल टॉवर्सची संख्या ८-१०असून तालुक्यातही ही संख्या लक्षणीय असल्याचे दिसून येत आहे. परदेशात मोबाईल टॉवर्स लोकवस्ती नसलेल्या ठिकाणी आणि त्या टॉवर्सचे नेटवर्क लोकवस्तीपर्यंत पोहोचावे असा नियम कटाक्षाने पाळला जात असताना भारतात आणि पोलादपूर तालुक्यात मोबाईल टॉवर अंगणात असल्यास दरमहा भाडेदेखील मिळण्याच्या आशेने अनेकांनी विविध कंपन्यांचे मोबाईल टॉवर्स लोकवस्तीतील जमिनींवर उभारून कमाई सुरू केली आहे. परिणामी, प्रत्येक मोबाईल टॉवरमुळे १ ते १.५ अंश तापमानवाढ होऊन तालुक्याचाही पारा काही वर्षांपासून कडाडला आहे.

**खबरबात**
**शैलेश पालकर**

चौपदरीकरणाच्या कामादरम्यान रस्त्याच्या दुतर्फा असलेले डेरेदार वृक्ष तोडल्याने लोहारमाळ परिसरातील सावलीच नाहीशी झाली असून रस्त्यालगतची काँक्रीटची गटारे आणि काँक्रीटचा ओव्हरब्रिज यामुळेदेखील रखरखीत उन्हाच्या झळा जाणवत आहेत. राष्ट्रीय महामार्गालगतची दुकानेदेखील या प्रचंड उन्हापासून बचाव करण्यासाठी बंद ठेवण्याची वेळ लोहारमाळवासियांवर ओढवली असून दुपारी दोन ते अडीच वाजण्याच्या सुमारास कोकणातील सर्वाधिक ४४.५ अंश तापमानाची नोंद झाल्याने या २८ एप्रिल २०१९ रोजीच्या तापमानवाढीची कारणमिमांसा सरकारी यंत्रणेकडून होण्याची गरज निर्माण झाली आहे.

पोलादपूर तालुक्यात कोठेही रासायनिक कारखानदारी नसताना अशाप्रकारची नोटीफिकेशन्स ॲक्युव्हेदर ॲपवरून ॲण्ड्रॉईड मोबाईलद्वारे प्राप्त झाल्यानंतर प्रशासनाकडे याबाबत माहिती असल्यास जाणून घेण्याचा प्रयत्न अनेकांनी केला, मात्र रविवारी मराठा कुणबी नोंदीबाबत प्रगणक शिबिर असल्याने कोणीही यांसंदर्भात माहिती दिली नाही. पोलादपूर तालुक्याच्या एका भागात टॅंकरमधून रसायनचोरीचे प्रकार होत असले तरी मोरगिरी भागात केवळ निसर्गाच्या सानिध्यात अशा प्रकारचे अनारोग्यकारक वायूंचा वातावरणामध्ये शिरकाव होण्याची शक्यता नसल्याचे सर्वांचे म्हणणे आहे. काहींनी बोअरवेलच्या पाण्यालाही आगपेटीच्या काडी जाळतानाचा दर्प येत असल्याचे सांगून प्रस्तुत प्रतिनिधीचे गंधकयुक्त पाणी भुगर्भातून मिळत असल्याकडे लक्ष वेधले. यामुळे सल्फरडाय ऑक्साईडचा दर्प भुगर्भातील पाण्यातून येत असल्याची शक्यता स्पष्ट झाली असली तरी नायट्रोजन डायऑक्साईड आणि कार्बन मोनॉक्सॉईडसारख्या विषारी घातक वायूंचा स्रोत कोणता याबाबत कोणाकडेही माहिती नसल्याचे दिसून आले.

या 'व्हेरी अनहेल्दी' वातावरणामुळे अनेकांना श्वासोच्छवासाचे विकार, हृदयरोग, मज्जाघात आणि फुफ्फुसाचा कर्करोग आदींची तसेच पुर्वीपासून आजारी असणाऱ्यांना वेगवेगळे आजार होण्याची शक्यता निर्माण होत असते. सर्वसाधारण जनतेसाठी हा व्हेरी अनहेल्दी वातावरणाचा इशारा सावधगिरीचा इशाराच असतो मात्र पोलादपूरसारख्या कोणत्याही प्रकारची रासायनिक कारखानदारी नसलेल्या तालुक्यामधील निसर्गाचा कुशीतील मोरगिरीसारख्या गावामध्ये अशाप्रकारचे व्हेरी अनहेल्दी वातावरण असल्याचे नोटीफिकेशन आता पोलादपूरकरांना निसर्गाचा खडबडून जागे करणारा इशारा असल्याचे मानले जात आहे.

पोलादपूर तालुक्यामध्ये कोणत्याही प्रकारची केमिकल इंडस्ट्री अथवा रासायनिक कारखाना नसताना तालुक्यातील मोरगिरी येथे अनारोग्यकारक वातावरण असल्याचे सलग तीन दिवस नोटीफिकेशन ॲक्युव्हेदर ॲपवरून ॲण्ड्रॉईड मोबाईलद्वारे इंटरनेट सुविधेचा वापर करणाऱ्यांना प्राप्त होत आहे, मात्र पोलादपूर तहसील कार्यालयाला अद्याप कोठेही अनारोग्यकारक वातावरण अथवा प्रदूषण असल्याचे आढळून आले नाही. या प्रकाराबाबत प्रशासन अनभिज्ञ आहे.

ॲण्ड्रॉईड मोबाईलद्वारे इंटरनेट सुविधेचा वापर करणाऱ्यांच्या मोबाईलवर गेल्या तीन दिवसांपासून तालुक्यातील मोरगिरी भागामध्ये अनारोग्यकारक वातावरण निर्माण झाल्याचे नोटिफिकेशन म्हणजेच सूचना प्राप्त झाल्या आहेत. या नोटीफिकेशनमध्ये शनिवारी एअर क्वालिटी इंडेक्स म्हणजेच एक्युआय १५१ ते २०० पर्यंत असणे म्हणजे अनहेल्दी आणि २००च्या पुढे असणे म्हणजे व्हेरी अनहेल्दी असल्याचे निर्देशित करण्यात आले होते. त्यावेळी एक्युआय १५१ म्हणजेच अनहेल्दी असल्याचे दिसून आले. रविवारी हा एक्युआय चक्क २०३ म्हणजे व्हेरी अनहेल्दी असल्याचे नोटीफिकेशन प्राप्त झाले. या सुचनेमध्ये हवेचा दर्जा अतिशय खराब असून दरवाजा बंद करून राहण्याचा सल्ला या ॲक्युव्हेदर ॲपवरून देण्यात आला होता. यासोबतच सकाळी १० वाजता १५१.९ एक्यूआय असताना दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास २०३.३ असल्याचे नोटीफिकेशनमध्ये नमूद करण्यात आले होते. यावेळी तुमच्या घराचे दरवाजे आणि खिडक्या बंद करून रहा, असे या सुचनेमध्ये नमूद करण्यात आले. या एक्युआय म्हणजेच एअर क्वालिटी इंडेक्स हवेचा दर्जा खराब असल्याचे स्पष्टीकरण करताना १२.९ सल्फर डायऑक्साईड, ३३.६ नायट्रोजन डायऑक्साईड, १६.६ ओझोन म्हणजे ऑक्सीजन ट्रायॉक्साईड आणि कार्बन मोनॉक्साईड २.९ असे प्रमाण हवेमध्ये असल्याने हवा आरोग्यास अपायकारक असल्याचे मेसेज अनेकांच्या मोबाईलवर झळकले.

प्रशासनाने मोबाईलवरून झळकणाऱ्या इशाऱ्यांना बेकायदेशीर ठरवावे किंवा ते इशारे खरे असतील तर आपत्ती ओढविण्यापूर्वी निवारणासाठी आणि आपत्तीपासून होणारी हानीनियंत्रित करण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करतानाही दिसणे आवश्यक आहे.

## बदलते तंत्रज्ञान



### व्हॉट्सॲपवर असे डाउनलोड करा प्रजासत्ताक दिनाचे स्टिकर्स

व्हॉट्सॲप युजर्ससाठी नवनवीन फीचर्स आणत असते. यावरून आपण एकमेकांशी संवाद साधू शकतो कारण हे एक मेसेजिंग ॲप आहे. कोणताही सण असो किंवा आनंदाचा दिवस असो आपण एकमेकांना शुभेच्छा देत असतो. त्यांना व्हॉट्सॲपचे स्टिकर्स आणि कोट्स डाउनलोड करण्यास आवडत असते. या वर्षी भारत २६ जानेवारी २०२३ रोजी आपला प्रजासत्ताक दिन साजरा करणार आहे. या वेळी व्हॉट्सॲपवरून तुम्हाला प्रजासत्ताक दिनाचे स्टिकर्स डाउनलोड कसे करायचे व आपल्या मित्रांना कसे पाठवायचे हे आपण जाणून घेऊयात.

१. प्रथम Google play Store उघडा आणि प्रजासत्ताक दिन whatsapp stickers सर्च करा.

२. यानंतर तुम्ही तुमच्या आवडीचा स्टिकर पॅक निवडा आणि तो पॅक डाउनलोड करा.

३. यानंतर कन्फर्म करून Add बटनावर क्लिक करा.

४. यानंतर कन्फर्म करून Add बटनावर क्लिक करा.

५. ते Add केल्यानंतर व्हॉट्सॲपवर जाऊन ज्यांना तुम्हाला पाठवायचे आहे ती चॅट विंडो उघडा.

६. यानंतर स्टिकर्स सेक्शनमध्ये जाऊन Add केलेल्या स्टिकर पॅकवर नेव्हीगेट करा.

७. स्टिकर पाठवण्यासाठी कोणत्याही स्टिकरवर क्लिक करा आणि ज्यांना पाठवायचे आहे त्यांना स्टिकर सेंड करा.

अशा प्रकारे तुम्ही एकमेकांना प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी व्हॉट्सॲपवरून स्टिकर पाठवू शकता. व्हॉट्सॲप हे 'मेटा'च्या मालकीचे माध्यम आपल्या युजर्ससाठी नवनवीन फीचर्स आणत असते.

प्रजासत्ताक दिन दरवर्षी मोठ्या प्रमाणात साजरा होत असतो. यानिमित्ताने ध्वज, फलक यांची खरेदी होत असते. हल्लीच्या युगात सोशल मीडियात हायटेक पद्धतीने शुभेच्छांचे आदानप्रदान होत असते. त्यामुळे जो तो अशाच प्रकारे शुभेच्छा ठेवतो. म्हणूनच स्टिकर्स आले आहेत.

# आज राष्ट्रीय मतदार दिवस

राष्ट्रीय मतदार दिवस दरवर्षी २५ जानेवारी रोजी भारतभर साजरा केला जातो. या दिवशी भारतातील प्रत्येक नागरिकाने आपल्या देशाच्या प्रत्येक निवडणुकीत सहभागी होऊन आपली जबाबदारी पार पाडण्याची शपथ घ्यावी कारण भारतातील प्रत्येक मतदाराचे मत देशाच्या भविष्याचा पाया घालते. म्हणून प्रत्येक व्यक्तीचे मत राष्ट्रनिर्मितीत अमूल्य आहे.

जगातील भारतासारख्या सर्वांत मोठ्या लोकशाही मध्ये मतदानासंदर्भात घसरणारा कल पाहता मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी राष्ट्रीय मतदार दिन साजरा केला जातो. भारतात होणारी प्रत्येक निवडणूक चांगल्या पद्धतीने पार पाडण्याची जबाबदारी भारतीय निवडणूक आयोगाची आहे. भारतीय निवडणूक आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९५० रोजी झाली. दिवसेंदिवस मतदानाविषयी वाढणारी उदासीनता व मतदानाची घसरणारी शेकडेवारी यामुळे निवडणुकीत लोकांचा सक्रिय सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने सन २०११पासून भारत सरकारने भारत निवडणूक आयोगाचा स्थापना दिन २५ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली. देशाच्या राजकीय प्रक्रियेत जास्तीत जास्त लोकांनी सहभाग घ्यावा व मतदारांना आपल्या मतदानाच्या कर्तव्याची जाणीव व्हावी यासाठी शासनाकडून व विविध सामाजिक संस्थांकडून या दिवशी मतदार




**निमित्त**

जनजागृतीसाठी अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात.

देशाची लोकशाही मजबूत करण्यासाठी सर्वच मतदारांना मतदान प्रक्रियेत सहभागी होणे आवश्यक आहे. त्यामुळे खरे प्रतिनिधित्व देशापुढे येईल कारण अनेकांनी मतदान न केल्यामुळे त्यांचा देशाला मिळालेला प्रतीनिधित्वाबद्दलचा कल लक्षातच येत नाही. त्याचप्रमाणे मतदारांचे केवळ एक मत सुद्धा प्रतिनिधित्व बदलू शकते. म्हणून देशाचा कारभार सांभाळणारे प्रतिनिधित्व निवडतांना योग्य व्यक्तीची निवड करण्यासाठी भारतातील प्रत्येक मतदाराने मतदानाच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेणे निकडीचे आहे.

भारतीय संविधानाने मतदारांना दिलेला मतदानाचा हक्क खूप अनमोल आहे. त्यामुळे आपल्या मतदानाचा हक्क सुज्ञपणे वापरून देशाला विकासाच्या मार्गावर वर घेऊन जाण्यासाठी आणि देशाची प्रगती साधण्यासाठी प्रत्येक मतदारांनी जागृत झाले पाहिजे.

देशाच्या मतदारांच्या एकूण संख्येत तरुण वर्गाची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे तरुणांनी देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी अधिकाधिक सहभागी होऊन स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या लोकशाहीच्या मूल्यांना अधिक बळकट करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यासाठी सर्व स्तरातून प्रयत्न होणे गरजेचे आहे. त्यातूनच भारताची लोकशाही अखंड राहील. मतदान प्रक्रियेत मतदारांचा जास्तीत जास्त सहभाग नोंदवणे, तसेच देशासाठी योग्य प्रतिनिधी निवडण्यासाठी मतदारांना मतदानाबद्दल जागृत करणे हे राष्ट्रीय मतदार दिनाचे उद्दिष्ट आहे. या उद्दिष्टपूर्तीसाठी तसेच देशात निष्पक्ष निवडणुका घडवून आणून भारतीय लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी भारतीय निवडणूक आयोगाचे ही महत्त्वपूर्ण योगदान आहे.

आज राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने देशातील प्रत्येक मतदाराने आपल्या सक्रीय सहभागाच्या आधारे व आपली सांविधानिक जबाबदारी पार पाडून लोकशाही मजबूत करण्याचा प्रयत्न संकल्प केला पाहिजे. शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते, मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**





**नवी मुंबई : येथील नेक्सस सीवूड्स मॉलमध्ये अनोख्या पद्धतीने प्रजासत्ताक दिन साजरा केला जात आहे. 'विंड्स ऑफ चेंज' या थीमद्वारे वेगाने होणाऱ्या विकसित भारताच्या गतिशीलतेला दर्शवण्यात आले आहे. नेक्सस सीवूड्सचे प्रांगण तिरंगा एलईडी लाईटने सुशोभीत करण्यात आले आहे तसेच मॉलच्या आत प्रवेश केल्यावर चरख्याच्या स्वरूपात मेन ॲट्रिअममध्ये २५ फूट तिरंग्याची प्रतिकृती साकरण्यात आली आहे.**

## आरोग्य प्रहर

### हिवाळ्यात कमी पाणी पिणे महिलांना ठरू शकते त्रासदायक

हिवाळा हा आपल्या आयुष्यात अनेक बदल घडवून आणतो. या ऋतूत आपली जीवनशैली अन्नापासून ते राहणीमानापर्यंत पूर्णपणे बदलते. थंडी पडताच तहान कमी लागत असल्याने अनेकजण पाण्याचे सेवन कमी करतात. पण असे करणे आपल्या आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते. वास्तविक, उन्हाळ्यात ज्याप्रमाणे शरीराला पाण्याची गरज असते, त्याचप्रमाणे हिवाळ्यातही शरीरासाठी पाणी तेवढेच आवश्यक असते. विशेषत: महिलांना थंडीत पाणी न मिळाल्याने त्रास होऊ शकतो. हिवाळ्यात महिलांनी आपल्या जीवनशैलीत कोणते बदल करावेत हे जाणून घेऊया...



डॉक्टरांच्या सांगण्यानुसार, या ऋतूत महिलांनी थंड पाणी पिण्याऐवजी कोमट पाणी प्यावे. थोड्या-थोड्या वेळाने पुरेसे पाणी प्यावे. अन्यथा डिहायड्रेशनचा त्रास होऊ शकतो. तसेच हिवाळ्यात फास्ट फूड खाणे टाळावे. जास्त तळलेले अन्नदेखील नुकसान करते. त्यामुळे ते खाणे टाळणेच योग्य ठरते. तसेच व्हिटॅमिन सीमध्ये अँटी-ऑक्सिडेंट मुबलक प्रमाणात असतात. त्यामुळे हिवाळ्यात त्याचे सेवन करावे. यासोबतच ड्रायफ्रुट्स खाणेदेखील फायदेशी ठरते.

थंडीच्या ऋतूमध्ये गर्भवती महिलांनी विशेष काळजी घ्यावी, त्यांच्या सर्व चाचण्या नियमितपणे करून घ्याव्यात आणि डॉक्टरांच्या सतत संपर्कात राहावे, असे डॉक्टरांनी सांगितले आहे. यासोबतच थंडीत येणारी फळं आणि भाजीपाला यांचे सेवन पुरेशा प्रमाणात करावे, जेणेकरून त्या निरोगी राहू शकतील. कुटुंबाची काळजी घेण्यात व्यस्त असलेल्या महिला आपल्या आरोग्याबाबत बेफिकीर होतात, त्या स्वतःच्या खाण्याकडे लक्ष देत नाहीत. त्यामुळे महिलांनी स्वत:साठीही वेळ काढणे फार महत्त्वाचे आहे.

डॉक्टरांच्या मते महिलांनी आपल्या आरोग्याची विशेष काळजी घ्यावी. अशा परिस्थितीत, त्यांनी नियमितपणे हलका व्यायाम करणे आवश्यक आहे. चालणे हा देखील चांगला व्यायाम आहे. म्हणूनच दररोज किमान ३० मिनिटे चालावे. हवामानातील सततच्या बदलामुळे, दिवसा अनेकदा थंड आणि गरम असा बदल जाणवू लागतो. अशा परिस्थितीत या ऋतूमध्ये व्हायरल इन्फेक्शनचे प्रमाण लक्षणीय वाढते. त्यामुळे अतिरिक्त सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.

थंड हवामानात जास्त गार वातावरणात जावे टाळावे. अशा वेळी सकाळी लवकर घराबाहेर पडणे टाळण्याचा प्रयत्न करा.


# जैववैद्यकीय कचऱ्यामुळे चरई खुर्द नदीचे पात्र दूषित

## सहा गावांतील ग्रामस्थांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

**तळा : रामप्रहर वृत्त**

चरई खुर्द नदीच्या पात्रात दवाखान्यातील जैववैद्यकीय कचरा टाकण्यात आला असून, यात वापरलेल्या सीरिजचा समावेश आहे. येथूनच सहा गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात असल्याने या गावातील ग्रामस्थांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. गुरांसाठी आणि शेतीसाठीदेखील या नदीच्या पात्रातील पाणी वापरले जात असल्याने नागरिकांच्या जीवाशी खेळण्याच्या या प्रकारामुळे संताप व्यक्त केला जात आहे.

२३ जानेवारी रोजी दुपारी तीनच्या सुमारास एका राखाडी रंगाच्या इको कारमधून चरई खुर्द गौळवाडी येथील नदीपात्रात हा जैववैद्यकीय कचरा टाकण्यात आला असल्याचे येथील ग्रामस्थांनी सांगितले. त्यावेळी ही घटना उघड झाली. या नदीवर चरई गौळवाडी, बेलघर खैराट, चरई खुर्द, वृंदावन, उसर खुर्द या गावांना पिण्याचा पाणीपुरवठा केला जातो. दुपारी तीनच्या सुमारास परिसरात कोणीही नसताना त्याचा फायदा घेत अनोळखीने वापरलेल्या सुया, ग्लोव्हज, वापरलेली इंजेक्शन, सिरीज आणि इतर साहित्य थेट नदीपात्रात टाकले आहे. हा कचरा कोणी टाकला याचा शोध घेणे गरजेचे आहे. त्या ठिकाणी जे साहित्य आहे, त्यावरील बॅच नंबरवरून हे साहित्य नेमक्या कोणत्या ठिकाणचे आहे याचा शोध घेऊन संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी चरई खुर्द ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.



# महिलांवर अत्याचार विषयावर कार्यशाळा

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या वतीने महिलांवर कामाच्या ठिकाणी होणारे अत्याचार या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. अ‍ॅड निलोफर शेख यांनी कामाच्या ठिकाणी महिलांवर होत असलेले अत्याचार या संदर्भात महिलांना कायद्याने कसे आपण अशा ठिकाणी आपली भूमिका घेतली पाहिजे, तसेच अशा प्रकारचा त्रास सहन करावा लागत असेल तर आपण कायद्याची मदत घेतली पाहिजे, असे सांगितले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव न्या. अमोल शिंदे यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे कार्य काय आहे हे समजावून सांगितले.

प्रदीर्घ चाललेल्या केसमध्ये तडजोड करण्याचे काम प्राधिकरणामार्फत केले जाते तसेच ज्या महिलांवर कार्यालयामध्ये अत्याचार होतात तो त्रास सहन करू नये. त्यासाठी कायद्याची मदत घ्यावी. महिलांच्या कायदेविषयक शंकांचे निरसन सचिव अमोल शिंदे यांनी केले. जिल्हा ग्रामीण विकास प्रकल्पाच्या प्रकल्प संचालिका प्रियदर्शनी मोरे यांनी महिलांना मार्गदर्शन केले.

रायगड जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले, सरकारी कर्मचारी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. त्यांनी प्रतिसाद लाभला. प्रास्ताविक, सूत्रसंचलन व आभारप्रदर्शन विधी स्वयंसेवक पूनम रांजणकर यांनी केले.

## जिल्ह्यात थंडी वाढली

**रायगड :** जानेवारीच्या शेवटाला जिल्ह्यात गुलाबी थंडीचा अनुभव नागरिक घेत आहेत. अलिबाग, महाड, पोलादपूर, खोपोली, रोहा, माथेरानसह सर्वच ठिकाणी थंडीने जोर धरला आहे. त्यामुळे नागरिकांमध्येही समाधानाचे वातावरण आहे.


**हरवले आहे**

श्री दिपक दत्तू भोईगडे. वय 34 वर्षे, धंदा. रा. रूम नं .307 ओल्ड हनुमान लेन बिल्डिंग नं - 27 / 30 क्रॉफोर्ड मार्केट CST (मुंबई) यांनी सीबीडी पोलीस ठाणे येथे येवून कळविले की दिनांक 28/12/2023 रोजी 16:30 वा चे सुमारास ते सीबीडी रेल्वे स्टेशन समोरील परिसर या ठिकाणी प्रवास करीत असताना त्यांचे जवळ असणारे खालील वर्णनाचे कागदपत्रे कोठेतरी पडुन गहाळ झाले आहे.1)बिल्डिंग , प्रथम आर्य, फ्लॅट नं -101, प्लॉट नं -444, सेक्टर -24, उलवे , (नवी मुंबई ) स्वतः चा मालकीचे वर नमुद घराचे अ‍ॅग्रीमेंट पेपर( अ‍ॅग्रीमेंट नं.15093/2023 दि-27/10/2023 (ओरीजनल पेपर). सदर बाबत सीबीडी पोलीस ठाणे प्रॉपर्टी मिसींग रजिनं 106/2024 दि 23/01/2024 अन्वये दप्तरी नोंद घेण्यात आली आहे.

**श्री दिपक दत्तू भोईगडे.**



**पनवेल महानगरपालिका, पनवेल**
ता. पनवेल, जि. रायगड–४१०२०६

जा.क्र./प.महा/पर्या./२८२४/प्र.क्र.०७/ /२०२४ दिनांक : २४/०१/२०२४

**-: जाहीर सुचना :-**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांन मध्ये पर्यावरण जनजागृती निर्माण करण्यासाठी (Fabrication and Supply of IEC Vechicle Mounted on EKA K १.५ or Equivalent Cabin Chassis) खरेदी करणे तसेच १ वर्ष Warranty + ४ वर्षा करीता देखाभाल व दुरुस्ती (AMC) करणेकामी या कामाचे अंदाजपत्रक बनविण्याकरीता खालील नमूद केलेल्या बाबींकरीता ई निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | नग | दर(GST सह व सर्व करांसहीत) |
|---|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांन मध्ये पर्यावरण जनजागृती निर्माण करण्यासाठी (Fabrication and Supply of IEC Vechicle Mounted on EKA K १.५ or Equivalent Cabin Chassis) खरेदी करणे तसेच १ वर्ष Warranty + ४ वर्षा करीता देखाभाल व दुरुस्ती (AMC) करणेबाबत. | ०१ | |


या निविदेबाबतची माहिती शासनाच्या WWW.Mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.२५ /०१/२०२४ ते ०५/०२/२०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजे पर्यंत उपलब्ध होईल. संबंधित निविदा धारकांनी याची नोंद घ्यावी.

सही /-
अतिरिक्त आयुक्त
पनवेल महानगरपालिका


## पद्मदुर्ग किल्ल्यात उद्या स्वच्छता मोहीम

**मुरूड :** ३५०वा शिवराज्याभिषेक प्रजासत्ताक दिनी ३५० किल्ल्यावर पूजन व ध्वजारोहण संकल्प असून त्याच अनुषंगाने २६ जानेवारी रोजी सकाळदरम्यान मुरूड पद्मदुर्ग किल्ल्यात स्वच्छता मोहीम व प्रथमच ध्वजारोहण होणार आहे. पद्मदुर्ग जागरचा १६वा वर्धापन दिन ४ फेब्रुवारी या दिवशी उत्साहात होणार आहे. पद्मदुर्गावर दूर्गदेवी कोटेश्वरीच्या चरणी पूजन तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची मिरवणूक आहे. शिवप्रेमीनी उपस्थित राहावे, असे आवाहन पद्मदूर्ग जागर व गड संवर्धन संस्थेचे अध्यक्ष आशिलकुमार ठाकूर यांनी केले.


|| श्री ||
**सदगुरु ज्योतिष (पनवेल)**




कॉम्प्युटराईअ, जन्मकुंडली बनवून मिळेल
शुभ कार्यासाठी पंचाग मुहुर्त, विवाह गुणमेलन
वैयक्तिक समस्यांसाठी कुंडलीद्वारे सल्ला मार्गदर्शन
ओरीजनल नवग्रह रत्न । उपरत्न मिळतील'

**संपर्क :- सदगुरु ज्योतिष १६०सुमित्रा सदन, शॉप ने १ केतकी हॉटेल समोर, शिवाजी रोड पनवेल जि. रायगड.**
**मो. नं.९७०२९३५३२८/९०२९८५०५८०**



**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल **१) श्री. विनायक अरुण कंकनवाडी, २) सौ. प्रतिभा विनायक कंकनवाडी, ३) श्री. अरुण बसप्पा कंकनवाडी,** हे खाली परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत तिचे मालक **श्री. नारायण वासुदेव व्यास** यांच्याकडून मोबदल्यापोटी विकत/हस्तांतरीत करुन घेण्याच्या विचारात आहे. तरी सदर मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण अगर इतर कोणत्याही प्रकारे कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणारे यांचेकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्त्यावर पोहोच कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**निवासी बिल्डींग/बंगला प्लॉट नं. १०, क्षेत्र १५० चौ.मी. आणि त्यावरील बांधकाम (तळ मजला + पहिला मजला + दुसरा मजला), क्षेत्र १३०.७५३ चौ.मी. बिल्टअप + वाढीव / अतिरिक्त क्षेत्र १८.७३३ चौ.मी. बिल्टअप = एकुण क्षेत्र १४९.४८६ चौ.मी. बिल्टअप, अमीत को. ऑप. हौ. सोसायटी लि. रोड नं. १२, सेक्टर नं. १९, नवीन पनवेल (पु.), ता. पनवेल, जि. रायगड.**

पनवेल.
दि. २३/०१/२०२४.

सही/-
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल मोबाईल क्र. : ९९३०३६९८६१


## मुरूडमध्ये एकाची फसवणूक; गुन्हा दाखल

**मुरूड : प्रतिनिधी**

मुलींसाठी दागिने हवे असल्याकारणाने मित्राला दुबईवरून सोन्याचे दागिने आणण्यासाठी नऊ लाख रुपये देऊ केले, परंतु दागिने न आणता फसवणूक केल्याप्रकरणी एकावर मुरूड पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबतचे सविस्तर वृत्त असे की, अगरदांडा येथील साकिब गजगे यांनी मुलींसाठी २४ कॅरेट सोन्याचे दागिने दुबई वरून आणण्यासाठी त्यांचा मित्र शहाबाज हुसेन सुरमेवाला याला नऊ लाख रुपयाची रक्कम अदा केली होती. दुबई येथे शुद्ध सोने मिळते यासाठी त्यांनी आपल्या मित्रास दुबईला जाणार म्हणून सोने आणण्यासाठी नऊ लाख रुपये दिले होते, परंतु मित्र दुबई वरून आला तरी सोने मात्र दिले नाही. त्यामुळे पाठपुरावा करूनसुद्धा पैसे परत न मिळाल्याने साकिब गजगे यांनी मुरूड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या तक्रारीवरून शहाबाज हुसेन सुरमेवाला यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


**रोहा नगर परिषद**
ता. रोहा, जि. रायगड पिन कोड नं. ४०२१०९
email : rohanagarpalika@gmail.com

क्र. रोनप/बांवि/ई-निविदा सुचना/१५३०/२०२३-२४ दिनांक २४/०१/२०२४

**जाहिर ई-निविदा सूचना**

रोहा नगरपरिषद हद्दीतील विकास कामाकरिता कामाचा अनुभव असणाऱ्या ठेकेदाराकडून विहित नमुन्यात ई-निविदा मागविणेत येत आहेत. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदा सुचना प्रसिद्धी, आवश्यक असणारी कागदपत्रे, शुद्धीपत्र इत्यादी माहिती https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २५/०१/२०२४ रोजीपासून उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख दिनांक ०२/०२/२०२४ रोजीपर्यंत राहील.

शिक्का

सही/-
**(पंकज भुसे)**
**मुख्याधिकारी**
**रोहा नगर परिषद**



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे विहीघर, तहसील – पनवेल, जिल्हा – रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्री. अशोक गोपाळ फडके, श्री. सुरेश गोपाळ फडके, राहणार : विहीघर, ता. पनवेल, जिल्हा रायगड यांचेकडून आमचे अशिलानी योग्य त्या परवानग्या घेवुन कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे विहीघर, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र | | | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| | | लावणी लायक | पोटखराबा | एकूण क्षेत्र | |
| | | हे.आर.प्रती | हे.आर.प्रती | हे.आर.प्रती | |
| १३९ | १ | १-०३-९० | ०-०४-५० | १-०८-४० | १६.४४ |

वरील शेतजमीन/मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

सही/-
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए.एल.एल.बी.
(खरेदीदाराचे वकील)

कार्यालयीन पत्ता – बी. १०२, पहिला मजला, श्री दत्तराज सोसायटी, जुने तहसिलदार ऑफिस समोर ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे मोहो, तहसील– पनवेल, जिल्हा– रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्री. सखाराम बाळू शिंदे, श्री. दर्शन मच्छिंद्र ठोंबरे, श्री. सिताराम हाल्या शिंदे, श्री. तुकाराम लडकू शिंदे, अर्चना मच्छिंद्र ठोंबरे (अ.पा.क. व स्वतः), सुजिता सुभाष पाटील, भाविका मच्छिंद्र ठोंबरे, हर्षदा मच्छिंद्र ठोंबरे, यमुना शांताराम बडेकर, गुलाब अरूण बोलाडे, मथुरा सुदाम आगिवले, शोभा दामोदर भालेकर, सुरेखा सुरेश ठाकूर, यांचेकडून आमचे अशिलानी योग्य त्या परवानग्या घेवुन कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे.

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे मोहो, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ६९/२ | १ | ०-४६-०० | ८.७६ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणते कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २४/०१/२०२४

सही/-
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए.एल.एल.बी.
(खरेदीदाराचे वकील)

कार्यालयीन पत्ता – बी. १०२, पहिला मजला, श्री दत्तराज सोसायटी, जुने तहसिलदार ऑफिस समोर ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६



**जाहीर नोटीस**
**शुध्दिपत्र**

**महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० चे कलम १०१ खाली दाखल दावा नोटीस**

**केशवस्मृति नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल,** या संस्थेने या कार्यालयाकडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये खालील व्यक्ती विरुद्ध थकित कर्जाचा भरणा केला नसल्याचे नमुद करुन वसुली प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे.

त्यानुसार या कार्यालयात वेळोवेळी सुनावणी ठेवण्यात आली, तथापि खालील नमुद व्यक्तींना सुनावणी नोटीसची पोहोच होत नसल्याने नैसर्गिक न्याय तत्वानुसार म्हणणे दाखल करण्यासाठी जाहीर नोटीस देण्यात येत आहे. या जाहीर नोटीसीद्वारे आपणास पुन्हा एक संधी देण्यात येत असून सदर दाव्याबाबत अंतिम सुनावणी **दि. ०५/०२/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता** ठेवण्यात आली असून सदर सुनावणीस आपण स्वतः वा आपले प्रतिनीधी मार्फत उपस्थित रहावे. आपण गैरहजर राहिल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याचा निकाल केला जाईल व नंतर आपले कोणतेही म्हणणे ऐकून घेतले जाणार नाही.

काही तांत्रिक चुकीमुळे पेपरमध्ये अंतिम सुनावणीची तारीख दि. २९/०१/२०२४ ऐवजी २१/०१/२०२४ अशी छापली गेली होती. तरी वरीलप्रमाणे **दि. ०५/०२/२०२४** रोजी अंतिम सुनावणीस हजर रहाणे.

| अ.क्र. | दावा क्र. | प्रतिवादीचे नांव | पत्ता | थकीत कर्ज |
|---|---|---|---|---|
| १ | ४२/२०२३-२४ | आरती विजय तायडे (कर्जदार) | एफ.००३, साई संसार कॉम्प्लेक्स, से-५, प्लॉट नं. ३०, नविन पनवेल. ४१०२०६ | रु.३,७२,०९८/- |
| | | रमेश पंढरी तायडे (जामिनदार) | प्रेरणा को. ऑप. हौ. सोसायटी, सुकापूर, नविन पनवेल, ता. पनवेल-४१०२०६ | |
| | | गोकूळ खंडू तांबे (जामिनदार) | के. २०५, शिवधारा कॉम्प्लेक्स, कोप्रोली, पो- नेरे, ता. पनवेल - ४१०२०६ | |
| २ | ४३/२०२३-२४ | मणिकम्मा नारायण कोल्लूर (कर्जदार) | मानेक नगर, एच. विंग, पहिला माळा, रूम नं १०२, परदेशी आळी, पनवेल ता. पनवेल. ४१०२०६ | रु.१,५५,६६०/- |
| | | स्नेहा जयेश म्हामूणकर (जामिनदार) | ३०१, यश प्लाझा, राम गडकरी रोड, लाईन आळी, पनवेल, जि. रायगड ४१०२०६ | |
| | | विजय जिवराम भिलारे (जामिनदार) | शिव कॉम्प्लेक्स, बी-३, पहिला मजला, गोखले हॉल, शेजारी, पनवेल, ४१०२०६ | |
| ३ | ४४/२०२३-२४ | स्वयंभू तवशिकणी नाडर (कर्जदार) | सिद्धीविनायक को. ऑप. हौ. सोसायटी, से-१९, नविन पनवेल, ४१०२०६ | रु.३,६६,५६७/- |
| | | बेरा रामजी गेला (जामिनदार) | ओम ग्रुप बिल्डर्स अँड डेव्हलपर्स, शॉप नं.२, प्लॉट नं. ई-७२, से-३, खारघर, ता. पनवेल. ४१०२०६ | |
| | | राजेश वसंत खंडागळे (जामिनदार) | इ/१/०८, से-१४, नविन पनवेल, ता.पनवेल, जि. रायगड, ४१०२०६ | |
| | | रवि वासू शेट्टी (जामिनदार) | कल्पतरू को. ऑप. हौ. सोसायटी, ए-२०३, खांदा कॉलनी, नविन पनवेल-४१०२०६ | |
| ४ | ४५/२०२३-२४ | हरिशंकर काळूराम सोनकर (कर्जदार) | ए टाईप, १३/३, सिडको कॉलनी, से-१३, नविन पनवेल, पनवेल, जि. रायगड ४१०२०६ | रु.१,५०,४४१/- |
| | | संतोषकुमार रामसखी सोनकर (जामिनदार) | से-४, रूम नं. १, हनुमान मंदिराजवळ, आसूडगाव, नविन पनवेल, ४१०२०६ | |
| | | मच्छिंद्र लक्ष्मण खाकाळ (जामिनदार) | ज्ञानेश्वर माऊली को. ऑप. हौ. सोसायटी, रूम नं. १२, बि. नं जी, विचुंबे, पो-ओ.एन.जी.सी, ता. पनवेल. ४१०२०६ | |
| ५ | ४६/२०२३-२४ | चंद्रपाल शिवनाथ रजपूत (कर्जदार) | गोल्डन रूद्र बेकरी, सुकापूर, नविन पनवेल, जि.रायगड ४१०२०६ | रु.७,४४,७९९/- |
| | | अमरनाथ जतनप्रसाद गुप्ता (जामिनदार) | १९, साई, छाया बिल्डिंग, प्लॉट नं. ४०४, पनवेल नविन पनवेल, ४१०२०६ | |
| | | घन:श्याम रामदेव प्रजापती (जामिनदार) | प्रजापती किनारा, जनरल स्टोअर्स, शॉप नं. ३, साई, छाया बिल्डिंग, ता. पनवेल. ४१०२०६ | |
| ६ | ४७/२०२३-२४ | संतोष शरद शिंदे (कर्जदार) | लक्ष्मी वसाहत झोपडपट्टी, पंचायत समिती, ता. पनवेल ४१०२०६ | रु.८८,९४१/- |
| | | संतोष सुर्यकांत अपसिंगेकर (जामिनदार) | वेदांत को. ऑप. हौ. सोसायटी, ए विंग, फ्लॅट नं. २०२, तक्का गाव, पनवेल-४१०२०६ | |
| | | शोभा शरद शिंदे (जामिनदार) | शिवाजी नगर झोपडपट्टी, पाण्याच्या टाकी जवळ, पनवेल. ४१०२०६ | |
| ७ | ४८/२०२३-२४ | हिरेश सुनील सुतार (कर्जदार) | सी. जे. मुणोथनगर, महात्मा फुले रोड, जुन्या पोस्ट ऑफिसजवळ, पनवेल. | रु.१,८६,५४४/- |
| | | योगेश नामदेव म्हात्रे (जामिनदार) | १४, मथवाडी, मु.पो. चिखले, ता. पनवेल, जि.रायगड | |
| | | सुनील शिवराम सुतार (जमिनदार) | डी.-२, सी. जे. मुणोथनगर, महात्मा फुले रोड, जुन्या पोस्ट ऑफिसजवळ, पनवेल. | |
| ८ | ४९/२०२३-२४ | आटीपोटा रामकृष्ण मेनन व हर्षद रामकृष्ण मेनन (कर्जदार) | ए /३, साईरत्न सोसायटी, प्लॉट नं ११८, मिडलक्लास हौसिंग सोसायटी, पनवेल. | रु.१,६२,२४२/- |
| | | आनंदन गोपाळ पिल्लई (जामिनदार) | सी /१०३, बल्लाळेश्वर सोसायटी, सावरकर चौक, पनवेल. | |
| | | जयंती सुरेन्द्रन नायर (जामिनदार) | सी-२०१, बिल्डींग नं. २, सुकापूर, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड | |
| ९ | ५०/२०२३-२४ | विष्णु गोपाळ पाटील (कर्जदार) | मु.पो. आजिवली, ता. पनवेल, जि. रायगड | रु.७७,३९६/- |
| | | रमेश गणु जाधव (जामिनदार) | मु.पो. आजिवली, ता. पनवेल, जि. रायगड | |
| | | सुनिल नागेश बहिरा (जामिनदार) | मु. तक्का, ता. पनवेल, जि. रायगड | |
| १० | ५१/२०२३-२४ | सतिश तुकाराम सकट (कर्जदार) | सिंधुदुर्ग को. ऑप. हौसिंग सोसायटी, साईनगर, फ्लॅट नं. ०१, ए विंग, पनवेल | रु.१,४०,०५३/- |
| | | भरत केदारी निकम (जामिनदार) | श्री हिमगिरी को. ऑप. हौसिंग सोसायटी, प्लॉट नं. ११९/१, कफनगर, पनवेल | |
| | | बापूराव धोंडिबा काळे (जामिनदार) | ज्ञानेश्वर माऊली को. ऑप. हौसिंग सोसायटी, बिल्डिंग नं. एफ/एम/१२, विचुंबे, पनवेल, ता. पनवेल | |
| ११ | ५२/२०२३-२४ | दत्तु सुंदरलाल चव्हाण (कर्जदार) | रुम नं. जी / ५, ज्ञानेश्वर माऊली को. ऑप. हौसिंग सोसायटी, विचुंबे, पनवेल, ता. पनवेल | रु.८०,१८२/- |
| | | विष्णु दगडु लोखंडे (जामिनदार) | मु. धामणगाव, ता. अष्टी, जि. बीड | |
| | | भगवान महादेव थोरात (जमिनदार) | कृषीउत्पन्न बाजार समिती, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड | |
| १२ | ५३/२०२३-२४ | संतोष किसन गायकवाड (कर्जदार) | मु. पो. वाशिवली, ता. खालापूर, जि. रायगड | रु.७१,७३५/- |
| | | भरत मारुती पाटील (जामिनदार) | मु. जाताडे, पो. रसायनी मोहपाडा, ता. खालापूर, जि. रायगड | |
| | | यशवंत महादू जाधव (जामिनदार) | मु. वदप, पो. गौरकामत, ता. कर्जत, जि. रायगड | |
| १३ | ५४/२०२३-२४ | सायराबानू अब्दुल शेख (कर्जदार) | गुरुनाथ बिल्डर्स, प्लॉट नं. ७०२, सेक्टर. १९, फ्लॅट नं.१२३, खारघर, ता. पनवेल, जि. रायगड | रु.१,५२,१५०/- |
| | | सचिन दामु वाघमारे (जामिनदार) | प्रथमेश सोसायटी, रुम नं. १८, प्लॉट नं. डी/६४, सेक्टर १२, खारघर, ता. पनवेल, जि. रायगड | |
| | | हनुमंत रामराव पवार (जामिनदार) | शकुंतलाबाई निवास, मुरबी गाव, सेक्टर १९, डीपीपी कॉलेजजवळ, खारघर, ता. पनवेल, जि.रायगड | |
| १४ | ५५/२०२३-२४ | श्रीदेवी यादप्पा डोमा (कर्जदार) | रचना रेसिडन्सी, रुम नं.४०१, डी विंग, टिळक रोड, पनवेल | रु.१,६०,१९०/- |
| | | राजश्री जनार्दन मेडीपल्ली (जामिनदार) | दत्तगुरु बिल्डींग, ब्लॉक नं. १०, जुन्या पोस्ट ऑफिसजवळ, पनवेल, ता. पनवेल | |
| | | विजय जीवराम भिलारे (जामिनदार) | शिवकॉम्प्लेक्स, बी-०३, पहिला मजला, गोखले हॉलजवळ, पनवेल, ता. पनवेल | |

सदरची नोटीस माझे सही शिक्क्यानिशी दिली आहे.
जा.क्र. ०१०५/२०२४
स्थळ- पनवेल
दिनांक-१५/०१/२०२४

शिक्का

सही/-
**(भारती काटुळे)**
सहाय्यक निबंधक

## निवडक

### नेताजी, बाळासाहेबांची जयंती साजरी

**नवी मुंबई :** महापालिकेच्या वतीने थोर स्वातंत्र्य सेनानी नेताजी सुभाषचंद्र बोस आणि वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त महापालिका मुख्यालयातील ॲम्फिथिएटर येथे प्रतिमा पूजन झाले. या वेळी प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे, सहाय्यक आयुक्त चंद्रकांत तायडे, प्रशासकीय अधिकारी उत्तम खरात, संजीव पवार व रवी जाधव आणि इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### बाळासाहेब ठाकरे यांची जयंती

**नवी मुंबई :** हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती



नेरूळ नवी मुंबई येथील शिवसेना मध्यवर्ती कार्यालयामध्ये माजी उपमहापौर अशोक गावडे यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आली. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या वेळी बबनराव वळसे, भगवान खुपटे, माणिक मोरे, रवि ढोबळे, समाधान वाघमारे, गोपाळ काटे आदी शिवसैनिक उपस्थित होते

### कळंबोलीत श्री मुथप्पन तिरुवप्पाना उत्सव

**पनवेल :** कळंबोली येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री मुथप्पन



सेवा समितीच्या वतीने श्री मुथप्पन तिरुवप्पाना महोत्सव साजरा करण्यात आला. केरळ येथील हिंदु समाजाचे श्रद्धास्थान आणि विष्णू भगवनाचे रूप असलेले श्री मुथप्पन तिरुवप्पाना देवस्थानचा महोत्सव नवी मुंबईत कळंबोली येथे आयोजित करण्यात आला होता. या महोत्सवात नवी मुंबईतल्या हजारो श्रद्धाळूंनी उत्सवाने भाग घेतला. या कार्यक्रमासाठी केरळामधून खास तिस पुजारी आमंत्रित करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी मुथप्पन सेवा समितीच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मण पटाणी, सचिव राजन नांबियार, खजिनदार ए. व्ही. सामील, राजू थक्काप्पण, नंदू नायर आणि बऱ्याच संस्थेच्या सभासदांनी विषेश श्रम घेतले.

### सीबीडीत महाआरती उत्साहात

**नवी मुंबई :** श्री गोवर्धनी सार्वजनिक सेवा संस्था व सिडको



यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नवी मुंबई सांस्कृतिक कला क्रीडा महोत्सव २०२४च्या अनुषंगाने अयोध्येमधील श्रीराम प्राणप्रतिष्ठेमुळे अवघी बेलापूर मतदार संघ राममय झाले तसेच संपूर्ण सीबीडी बेलापूरमध्ये श्रीरामाचा जयघोष करण्यात आला. आमदार मंदा म्हात्रे यांच्या नेतृत्वात अयोध्यामधील श्रीराम प्राणप्रतिष्ठेचे औचित्य साधत संपूर्ण नवी मुंबईमधील सीबीडी येथील गावस्कर मैदानामध्ये भव्य दिव्य अशी महाआरती साजरी करण्यात आली. शेकडो नागरिक भक्तिभावाने यात सहभागी झाले होते. त्यामुळे सीबीडी भक्तिभावात न्हाऊन निघाले होते.

# नवी मुंबईत मराठी भाषेचा गौरव

**नवी मुंबई : बातमीदार**

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त मराठी भाषेचा गौरव वाढविणाऱ्या विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यासोबतच यामध्ये नमुंमपा अधिकारी, कर्मचाऱ्यांचा प्रत्यक्ष सहभाग असावा यादृष्टीने महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध स्पर्धात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून त्यामधील वक्तृत्व स्पर्धा झाल्या.



भारतीय संविधानाचे हे अमृत महोत्सवी वर्ष असून मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यात संविधानाचाही जागर व्हावा यादृष्टीने माझे संविधान, माझा अभिमान या विषयावर अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पाच मिनिटांच्या मर्यादेत स्पर्धकाने आपले मनेगत व्यक्त करायचे होते. या अनुषंगाने १३ अधिकारी, कर्मचाऱ्यांनी सहभागी होत संविधानाविषयी भावना व्यक्त केल्या. संविधानाचे अभ्यासक आणि संविधान प्रचारक लोकचळवळीतील व्याख्याते ॲड. निलेश खानविलकर यांनी या स्पर्धेचे परीक्षण केले. त्यांचा महापालिका सचिव चित्रा बाविस्कर यांच्या हस्ते, शिक्षणाधिकारी अरुणा यादव यांच्या उपस्थितीत सन्मान करण्यात आला.

स्पर्धेत सहभागी स्पर्धकांचे भारतीय संविधान या विषयाचे आकलन, त्यांनी विषयाची केलेली मांडणी, भाषा प्रावीण्य, सादरीकरण व त्याचा श्रोत्यांवरील प्रभाव या पाच निकषांच्या आधारे परीक्षण करण्यात आले. यातील विजेत्या स्पर्धकांना गुरुवारी (दि. २५) संयुक्त पारितोषिक वितरण समारंभात सन्मानित करण्यात येणार आहे.

### आज विविध स्पर्धा

**नमुंमपा अधिकारी, कर्मचारी वृंदाकरीता आयोजित विविध स्पर्धांमधील परकाव्यवाचन स्पर्धा गुरुवारी (दि. २५) सकाळी ११ वाजता, नमुंमपा मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात होणार असून या स्पर्धेमध्ये आपल्या आवडत्या कवीच्या कवितेचे सादरीकरण करणे अपेक्षित आहे. या स्पर्धेनंतर सायंकाळी ४ वाजता परकाव्यवाचन स्पर्धेसह वक्तृत्व स्पर्धा तसेच घोषवाक्य/चारोळी लेखन स्पर्धा अशा तिन्ही स्पर्धांचा पारितोषिक वितरण सोहळा ज्ञानकेंद्रातच मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.**

## ड्रोनद्वारे तळोजा कारागृहाचे चित्रीकरण करणाऱ्यावर कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

विविध दहशतवादी संघटनेचे दहशतवादी, गँगस्टर, नक्षलवादी यांच्यामुळे अतिसंवेदनशील बनलेल्या तळोजा कारागृहाचे अज्ञात व्यक्तीने ड्रोन कॅमेऱ्याद्वारे चित्रण केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

विशेष बाब म्हणजे कारागृहाचा बेकायदा व्हिडीओ काढणाऱ्या व्यक्तीने हा व्हिडीओ इन्स्टाग्रामवर टाकून तळोजा मध्यवर्ती कारागृहाची सुरक्षितता धोक्यात आणली आहे. खारघर पोलिसांनी या व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आलेल्या अज्ञात व्यक्तीने ड्रोन कॅमेऱ्याद्वारे तळोजा कारागृह परिसरातील प्रतिबंधित क्षेत्राचे विनापरवानगी अवैधरीत्या चित्रण केले. त्यानंतर हा व्हिडीओ त्याने इन्स्टाग्रामवर अपलोड केला. हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर तळोजा कारागृह प्रशासन खडबडून जागे झाले. त्यानंतर कारागृह प्रशासनाने या व्हिडीओबाबत माहिती घेतली असता, तळोजा कारागृहातील प्रतिबंधित क्षेत्रातील कैद्यांचे व तुरुंग परिसराचे ९.४२ वाजता ड्रोन कॅमेऱ्याद्वारे चित्रण केल्याचे आढळून आले. त्यानंतर हा व्हिडिओ आर्चिस लिमये याच्या अकाउंटद्वारे राहुल उत्तेकर इन स्टोरी या नावाने सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आल्याचे आढळून आले.

तळोजा मध्यवर्ती कारागृहाची सुरक्षितता धोक्यात आणण्याच्या तसेच, शासकीय गुप्ततेचा भंग करण्याच्या उद्देशाने हा प्रकार केल्याचे आढळून आले.

या प्रकारामुळे कारागृहातील सुरक्षेला धोका निर्माण झाल्याने तुरुंग अधिकाऱ्यांनी खारघर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात तक्रार दाखल करून त्या व्यक्तीचा शोध सुरू केला आहे.

## दिघाटीत श्रीराम मंदिर सोहळ्यानिमित्त मिरवणूक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रभू श्रीरामाची जन्मभूमी अयोध्या येथील नवीन बांधलेल्या मंदिरात शुभमुहूर्तावर प्राणप्रतिष्ठा सोहळा मोठ्या भक्तीभावाने, झाला. पनवेल तालुक्यातील दिघाटी गावातील ग्रामस्थांनी मोठ्या भक्तीभावाने यानिमित्त गावात मिरवणूक काढली होती.



गावातील प्रत्येक लहान थोर व्यक्तीने हा मोठा सण समजून साजरा केला. दोन दिवस अगोदर प्रत्येक रस्ता घर स्वच्छ करून घरासमोर रांगोळ्या काढल्या, संध्याकाळी दिप प्रज्वलीत केले आणि त्यामुळे संपूर्ण गाव भक्ती आणि उत्साहाच्या सुगंधाने दरवळून गेले. संपूर्ण दिवस भक्तीमय होऊन गेला. सकाळी मंदिरातील काकडानंतर राममूर्तीचा अभिषेक व पूजन झाले. त्यानंतर श्रींची पालखी (दिंडी) सोहळा, श्रीराम प्रतिष्ठान सोहळा तसेच हरिपाठ, कार्यक्रम झाले.

या वेळी दिव्यांनी मंदिर परिसर उजळून निघाला. अत्यंत उत्साहाने सर्व ग्रामस्थ सहभागी झाले. अयोध्या येथून प्राप्त अक्षतांचे प्रत्येक घरी पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी साठी सर्व ग्रामस्थ मोठ्या संख्येने व एकोप्याने एकच आले.

## नवी मुंबईतही मराठा सर्वेक्षणाला सुरुवात

### महापालिकेचे ११००हून अधिक कर्मचारी सेवेत

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगामार्फत २३ जानेवारीपासून मराठा समाज आणि खुल्या प्रवर्गातील कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यासाठी राज्यव्यापी विशेष मोहीम राबविण्यास सुरुवात झाली आहे. यामध्ये महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महापालिकेची यंत्रणा सज्ज झाली असून सर्वेक्षणाकरता ११००हून अधिक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

हे सर्वेक्षण कालबद्धरितीने अचूकरित्या पूर्ण करण्यासाठी



पर्यवेक्षकांचे व प्रगणकांचे प्रशिक्षण घेण्यात आलेले असून या सर्वेक्षणाकरीता शासनाच्या वतीने विकसित करण्यात आलेल्या विशेष पवर गृहभेटी देऊन माहिती संकलित करण्यास सुरुवात झालेली आहे.

राज्य मागासवर्ग आयोगाच्या निर्देशानुसार सर्वेक्षणाचे काम २३ ते ३१ जानेवारी या कालावधीत करण्यात येत असून या सर्वेक्षणासाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने ११०० हून अधिक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

हे कर्मचारी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात गृहभेटी देणार असून शासनाने दिलेल्या विहित नमुन्यात माहिती संकलित करणार आहेत. तरी नागरिकांनी आपल्या घरी माहिती संकलित करण्यासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांना अचूक माहिती द्यावी व संपूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन नवी मुंबई मनपा आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.



**पनवेल : तालुक्यातील कासप गावात राममंदिर लोकार्पण उत्सव आनंदात साजरा करण्यात आला. या वेळी भजन, दिंडीचे आयोजन करून फटाके, दिवे लावण्यात आले. या वेळी गावातील तरुण वर्ग, वारकरी संप्रदाय, श्री समर्थ बैठक, स्वाधाय परिवार, तसेच माजी सरपंच, उपसरपंच, सदस्या व ज्येष्ठ वर्ग उपस्तित होता.**

## सुभाषचंद्र बोस, बाळासाहेब ठाकरेंना अभिवादन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

भारतीय स्वातंत्र लढ्यातील अग्रणी सेनानी आणि महान नेते नेताजी सुभाषचंद्र बोस आणि हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंतीनिमित्त मंगळवारी (दि. २३) त्यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून कोकण भवन येथे अभिवादन करण्यात आले.



या वेळी कोकण भवनातील अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वातंत्र्यवीर सुभाषचंद्र बोस यांनी दुसरे महायुद्ध सुरू असताना इंग्रजांशी लढण्यासाठी जपानच्या मदतीने आझाद हिंद फौज स्थापन केली होती. त्यांनी दिलेला, 'तुम मुझे खून दो, मै तुम्हे आझादी दूंगा'चा नारा हा भारताचा राष्ट्रीय नारा बनला. व्यंगचित्रकार असलेल्या हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी मराठी माणसांच्या अस्मितेवर शिवसेना पक्षाची स्थापना करीत राज्याच्या राजकारणात अल्पवधीतच दबदबा निर्माण केला. त्यांनी हिंदुत्वाच्या मुद्देवर राजकारणाला वेगळे वळण दिले.

## गृहनिर्माण सोसायट्यांमध्येही राम मंदिर लोकार्पणानिमित्त विविध कार्यक्रम

**पनवेल : वार्ताहर**

अयोध्या येथे बांधण्यात आलेल्या श्रीप्रभू रामचंद्राच्या मंदिराचे उद्घाटन आणि मूर्तीची प्रतिष्ठापना विधिवत करण्यात आली. या निमित्ताने देशभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होतेच. त्याचबरोबर कळंबोली येथील सेक्टर १४मधील आशीर्वाद सोसायटीमध्ये धार्मिक कार्यक्रम झाला.




अयोध्या येथे प्रभू रामचंद्राचे मंदिर व्हावे यासाठी समस्त हिंदू धर्मियांची मागणी होती. रामभक्तांचे स्वप्न अखेर पूर्ण झाले. राममंदिराचे उद्घाटन झाले. त्याचबरोबर देखण्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठासुद्धा विधिवत करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते हा ऐतिहासिक समारंभ झाला. दरम्यान, या निमित्ताने संपूर्ण देशात एकप्रकारे दीपावली साजरी करण्यात आली. यामध्ये कळंबोली सेक्टर १४ येथील आशीर्वाद सोसायटीसुद्धा मागे राहिली नाही. येथील रहिवाशांनी एकत्रित येत श्री प्रभू रामचंद्र मंदिराच्या उद्घाटनानिमित्त विविध धार्मिक, अध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले. भगव्या ध्वजाने संपूर्ण सोसायटी सजवण्यात आली. त्याचबरोबर आकाशकंदील आणि दिवे लावून रोषणाई करण्यात आली. त्याचबरोबर प्रभू रामचंद्राच्या प्रतिमेचे पूजन करून महाआरती घेण्यात आली.

प्रसादाचेसुद्धा वाटप करण्यात आले. गृहनिर्माण संस्थेतील मुलांनी विविध कलागुणांचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेहा आणि ऋषिकेश कदम या दांपत्याने केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोसायटीचे चेअरमन सचिन नारंगीकर, सचिव यशवंत पार्टे, खजिनदार शिवाजी पाटील यांनी परिश्रम घेतले.

# प्रजासत्ताक दिनानिमित्त बाजारपेठ सजली

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

प्रजासत्ताक दिनाला काही तास उरले असताना त्यानिमित्ताने बाजारपेठा सजल्या आहेत. दरवर्षी बाजारात प्रजाकसत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर बाजारात काहींना काही नवीन वस्तू पहायला मिळतात. अशातच प्रजासत्ताक दिनाच्या विविध कार्यक्रमांची आतापासून रूपरेषा आखली जात आहे. त्यामुळे गतवर्षीच्या तुलनेत यंदा तिरंगा आणि खादीच्या कपड्यांना अधिक मागणी वाढली आहे.




यातच प्रजासत्ताक दिन साजरा करण्यासाठी सर्वांनी आपापल्या पद्धतीने तयारी करण्यास सुरूवात केली आहे. प्रजासत्ताक दिनाची चमक शहरात दिसू लागली आहे. मोठमोठे व्यापारी आणि रस्त्यावरील विक्रेत्यांनी आपली दुकाने तिरंगा, दुपट्ट्या, माळा, पतंगांनी रंगवली आहेत. भगवा, पांढरा आणि हिरवा रंग वापरून बनवलेल्या अनेक प्रकारच्या वस्तू बाजारात विकल्या जात आहेत. खेळण्यांची मागणी करणारी मुले तिरंग्याच्या टोप्या, लॉकेट आणि सोनेरी आणि चांदीच्या रंगात रंगलेल्या तिरंग्याच्या बांगड्या खरेदी करताना दिसतात.

या शिवाय तिरंग्याच्या प्लास्टिकच्या टोप्या, हँडबँड आणि मुलींसाठी तिरंग्याचे दुपट्टे, हेअर बँड, बांगड्या, टी- शर्ट आदींची खरेदी केली जात आहे.

दुचाकी आणि वाहनांवर झेंडे लावण्यासाठी मोठी मागणी असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. प्रजासत्ताक दिनानिमित्त बाजारपेठा तिरंगा आणि इतर साहित्याने सजवण्यात आल्या आहेत. बाजारपेठांमध्ये सर्वत्र तिरंगा दिसत आहेत. वेगवेगळ्या आकारातील राष्ट्रध्वजाव्यतिरिक्त, ब्रोचेस, टोप्या, रिबन इत्यादी तिरंग्यांच्या विविध वस्तूदेखील आहेत.

यासोबतच भेटवस्तूंमध्ये तिरंग्यासह घड्याळ, स्टँडसह तिरंगा इत्यादींचाही समावेश आहे. नागरिकांनी दुकानांवर तिरंगा व इतर साहित्याची खरेदी सुरू झाली आहे. नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील सिग्नल, एपीएमसी मार्केट, पालिकेच्या आठही नोडमधील दुकानामध्ये झेंडे, टी-शर्ट, दुपट्टा, कुर्तीबरोबर खादीचे कपडे विक्रीसाठी दुकानात उपलब्ध आहेत.

नवी मुंबईतील विविध शाळा, सोसायट्यांमध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. यासाठी अनेकांचा खादीचे कपडे, वूलनचे जॅकेट, टी-शर्ट घेण्याकडे कल आहे. अशातच पूर्वी केवळ शासकीय कार्यालये, सहकारी संस्था, शाळा-महाविद्यालये, काही निवडक वर्गातील आस्थापनांनाच राष्ट्रध्वज फडकावण्याची परवानगी होती, मात्र आता देशातील प्रत्येक नागरिकाला राष्ट्रध्वज लावण्याची परवानगी दिल्यामुळे तिरंग्याच्या विक्रीतही वाढ झाली आहे. त्यामुळे तिरंग्याबरोबरच खादीचे कपडे, वुलनचे जॅकेट, खादीची टोपी यांना मागणी वाढली आहे. त्यातच महिलांसाठी तिरंग्या साड्या तसेच खादीच्या पांढऱ्या रंगाच्या साड्यांनादेखील मागणी वाढली असल्याचे व्यापारी रुपचंद राठोड यांनी सांगितले.

## नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

नेताजी सुभाषचंद्र बोस यांची १२७वी जयंती वाशी येथील नेताजी सुभाषचंद्र बोस स्मृती संस्थानच्या वतीने मोठ्या थाटामाटात साजरी केली. सर्वप्रथम वाशी सेक्टर १७ येथील नेताजी या चौकात सहाय्यक पोलीस निरीक्षक (वाहतूक विभाग) योगेश गायकवाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.



यानंतर संस्थेच्या वाशी कार्यालयात एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उत्तर भारतीय नेते, अभिनेते व माजी सैनिक एस. सी. मिश्रा कार्यक्रमात सरदार वल्लभभाई पटेल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आणि अपना दलाचे महाराष्ट्र प्रभारी महेंद्र वर्मा, ज्येष्ठ पत्रकार नारायण जाधव, सर्वधर्मीय विकास मंचचे अध्यक्ष मेघनाथ भगत, भाजपा नवी मुंबई जिल्हा उपाध्यक्ष प्रभाकर कोळपकर, जनकल्याण सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजेश शर्मा, अपना दल नवी मुंबई अध्यक्ष आशिष गोस्वामी यांनी या कार्यक्रमात मनोगत व्यक्त केले.

या वेळी कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून आलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश गायकवाड यांचे पत्रकार परमानंद सिंग यांनी स्वागत केले. दीक्षा बुक सेंटरचे संचालक दिनेश चव्हाण यांनी त्यांना भागवत गीताही भेट म्हणून दिली होती. या वेळी पत्रकार रामप्रीत राय, अजेंद्र आगरी, जनकल्याण समाज संस्थेचे नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष मफतलाल चव्हाण, स्वर्णलता प्रधान, उन्नीकृष्णन, रमेश प्रजापती, आरटीआय कार्यकर्ते विजय नायर आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन संस्थेचे अध्यक्ष व ज्येष्ठ पत्रकार विनोद प्रधान यांनी केले, तर आभार पत्रकार सुरेंद्र सरोज यांनी मानले.

# रेवदंड्याच्या मुख्य रस्त्यावर कचऱ्याचे साम्राज्य

## अनेकांच्या संतप्त प्रतिक्रिया



**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंड्यात प्रवेश करताच, थेरोंडा पानसेवाडीनजीक टॉकिज रस्तानजीक मुख्यः रस्तावर ग्रामस्थांनी मुजोरी करून केरकचरा, प्लास्टिक साहित्य टाकून डंम्पिग ग्राउंड निर्माण केले आहे. परिसरातून जा-ये करणाऱ्यांना दुर्गंधी सहन करूनच पुढे जावे लागते. अनेकांनी या अघोषित डंम्पिग ग्राउंडबाबत संपप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत.

रेवदंडा मुख्यः रस्त्यालगत ग्रामस्थांनी केरकचरा, प्लास्टिक व घाणीचे साहित्य टाकून आकस वृत्तीने डंपिग ग्राउंड तयार केले आहे. निदान मुख्यः रस्तालगत केरकचरा न टाकण्याची खबरदारीसुद्धा स्थानिक ग्रामस्थ घेत नसल्याचे दिसते.

स्थानिक ग्रामस्थांच्या बेशिस्तीने मुख्यःरस्तालगत डंम्पिग ग्राउंड तयार झाल्याने समस्त रेवदंडकरांना शरमेची बाब झाली आहे, मात्र बिनधास्त व कोणताही धाक न घेता, परिसरातील स्थानिक ग्रामस्थ केरकचरा तेथेच टाकत आहेत.

याबाबत काही ग्रामस्थांनी रेवदंडा ग्रामपंचायतीचे लक्ष्य वेधण्याचा प्रयत्न केला आहे. काही ग्रामस्थांनी रेवदंडा ग्रामपंचायत सरपंच प्रफुल्ल मोरे यांचेशी थेट संपर्क करून या डंमिपग ग्राउंडबाबतची तक्रार व माहिती दिली आहे. रेवदंड्याच्या प्रवेशद्वाराजवळील मुख्य रस्त्यालगत आकसाने बनविण्यात आलेले डंम्पिग ग्राउंड त्वरीत बंद करणेत यावेत अशी मागणी सर्व थरातून केली जात आहे.

रेवदंडा ग्रामपंचायतीची घंटागाडी नित्याने सुरू आहे, मात्र काही ग्रामस्थ घंटा गाडीच्या सुविधेचा लाभ न घेता, बेपर्वाईने मुख्य रस्तालगत केरकचरा व घाण टाकत आहेत, ही बाब रेवदंडा गावासाठी शरमेची बाब आहे, प्रत्येक ग्रामस्थांनी स्वतः स्वच्छतेसाठी योगदान देणे जरूरीचे आहे. येथील केरकचरा व घाण ग्रामपंचायतीचे वतीने लवकरच हटविण्यात येईल, परंतु ग्रामस्थांनी गावाच्या हितासाठी व स्वच्छतेसाठी रस्तालगत केरकचरा व घाण टाकू नये, असे आवाहन सरपंच प्रफुल्ल मोरे यांनी रेवदंडा ग्रामस्थांना केले आहे.

# मोरबे धरणग्रस्त कृती समितीचे आंदोलन तूर्त स्थगित

## मागण्यांचा गांभिर्याने विचार करण्याची मागणी



**चौक : प्रतिनिधी**

मोरबे धरणग्रस्तांना पुनर्वसन कायदा २०१३चा लागू करण्यासंदर्भात शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याची तयारी रायगड जिल्हाधिकारी यांनी दाखविल्याने मोरबे धरणग्रस्त कृती समितीने पुकारलेले आंदोलन तूर्तास स्थगित करण्यात आले आहे, असे समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले.

नवी मुंबई महापालिका पूर्ण क्षेत्र व पनवेल महापालिकेतील खारघर व कामोठे परिसराला पाणीपुरवठा करणारे मोरबे धरण हे खालापूर तालुक्यातील मोरबे गावच्या ठिकाणी असून आठ महसुली गावे व सात आदिवासीवाड्या जागेवर हे धरण बांधले गेले आहे. शासनाला ही शेवटची संधी देण्यात आल्याचे मोरबे धरणग्रस्त कृती समितीचे कार्याध्यक्ष परशुराम मिरकुटे यांनी सांगितले. आमच्या मागण्यांचा गांभिर्याने विचार करावा, असे समितीचे अध्यक्ष जगन्नाथ पाटील म्हणाले. सचिव योगेश प्रबलकर यांनी योग्य पुनर्वसन व मोबदला न मिळावा, असे आग्रही म्हणणे मांडले.

या धरणात आदिवासींच्या जमिनी गेल्या असून ते भूमिहीन झाला असल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, असे आदिवासी समाजाचे अंकुश वाघ यांनी सांगितले. आदिवासी तरुणांचे नेते ललित उघडे, आरपीआयचे कार्यकर्ते किशोर निकाळजे यांनीही मत मांडून प्रश्न मार्गी लावावा, असे नमूद केले.

संपादित जमिनीव्यतिरिक्त शिल्लक जमीन आम्हाला कसण्यासाठी द्यावी, आम्ही कसण्यासाठी प्रयत्न केल्यास आमच्यावर कायद्याचा बडगा उगारण्यात येतो, असे चौक ग्रामपंचायत सदस्य राजू पाटील म्हणाले. पत्रकार परिषदेला समितीचे खजिनदार मिलिंद राणे, अनिल प्रबलकर, विनायक देशमुख, अनिल भुवड, गोपीनाथ मोरे यांच्यासह प्रकल्पग्रस्त उपस्थित होते.

# मुरुडमध्ये इर्टिगा गाडीचा अपघात होऊन एकाचा मृत्यू

**मुरुड : प्रतिनिधी**

मुंबईहून काशीद समुद्र किनारी फिरावयास येणाऱ्या पर्यटकांच्या गाडीचा एका अवघड वळणावर गाडीचा ताबा सुटल्याने गाडीच्या चालकाच्या बाजूला बसलेला तरुणाला आपला नाहक जीव गमवावा लागला.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, मुंबईमधून चार मित्र मारुती सुझुकी इर्टिगा गाडी (एमएच ०२ सीडब्लू २१३१) ने काशीद येथे फिरावयास येत होते. दोघे पुढे तर दोघे मागच्या सीटवर बसून त्यांचा प्रवास मजेत चालला होता, परंतु मुंबई येथील पर्यटकांना येथील अवघड वळणाचे ज्ञान नसल्याने व गाडी सुसाट चालवल्यामुळे बारशीवचा घाट सोडल्यानंतर



काशीद जवळील एका अवघड वळणार गाडीच्या चालकाचा ताबा सुटल्याने गाडीने पलटी झाली. त्यामुळे चालकाच्या बाजूला बसलेला मंदार नरेश मुरकर (रा.रत्नागिरी) हा गाडीतून पडून रस्त्यावर आपटला व त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.

या गाडीत असलेले साईनाथ कुडिकेला (रा. सायन मुंबई), हेमंत विजकुमार मिश्रा (रा. संगमनगर वडाळा-मुंबई) व सुनील गायकर (रा. कळंबोली, पनवेल) या सर्वांची प्रकृती ठिक आहे.

या सर्वांना मुरुड ग्रामीण रुग्णालयात उपचार देण्यात आले आहेत.

# मुरूडमध्ये बाळासाहेब ठाकरे यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी

**मुरूड : प्रतिनिधी**

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त मुरूडमध्ये माजी नगराध्यक्ष कल्पना पाटील यांच्या हस्ते बाळासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर शहरातील डायलेसिस सेंटर व ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना फळ व पोषक आहार वाटप करण्यात आले. यासह शिवसैनिकांनी रक्तदान केले.

या माजी नगराध्यक्ष स्नेहा पाटील, माजी नगराध्यक्ष अशोक धुमाळ, शहरप्रमुख संदीप पाटील, महेश भगत, महेश पाटील, मेघाली पाटील, युगा ठाकूर, योगेश ठाकूर, शाहिस्ता शेख, सुनील शहा, नितीन आंबुर्ले, श्रीकांत खोत, श्रीकांत सुर्वे आदी उपस्थित होते.

शहरातील भोगेश्वर पाखाडीतील शेतकरी जयकांत भायदे यांच्या चार म्हशी व एक गाय विजेच्या धक्याने मरण पावली होती. या शेतकऱ्याला मदत म्हणून शिवसेनेकडून २५ हजार रोख मदत माजी नगराध्यक्ष अशोक धुमाळ यांच्या हस्ते देण्यात आली.



# कर्जतमध्ये कारसेवकांचा सन्मान; संगीत मैफिल रंगली

**कर्जत : प्रतिनिधी**

अयोध्येमध्ये श्री रामांचा प्राणप्रतिष्ठा सोहळा पार पडला. त्यानिमित्ताने कर्जतमध्ये विविध ठिकाणी कारसेवकांचा विशेष सन्मान करण्यात आला. या वेळी कारसेवकांचे चित्तथरारक अनुभव ऐकून उपस्थितांच्या अंगावर शहारे आले.

वेणगाव येथील श्री महालक्ष्मी देवस्थान व ग्रामस्थांच्या वतीने कारसेवकांच्या विशेष सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. देवस्थान समितीचे अध्यक्ष रंजन दातार, उपाध्यक्ष विवेक जोशी, खजिनदार दीपक बेहेरे, सचिव विनय जोशी, सहसचिव विलास वैद्य यांच्या हस्ते वसंत सुर्वे व सुनील दांडेकर यांच्या नेतृत्वाखाली आयोध्येला गेलेल्या ॲड. दीपक गायकवाड, विकास चित्ते, चंद्रकांत कुडे, अनिल सुर्वे,



प्रवीण पोलकम, धनु तिवारी, राजाभाऊ कोठारी, दीपक बेहरे, राजेश कुलकर्णी, मंगेश राऊत, अभय गुरव, नंदकुमार मणेर, राजू वर्धावे, सुनील जाधव, विजय जिनगरे, राजेंद्र जगताप, संजय वझरेकर, विजय कडू, देवेंद्र खोत, अमित गुरव, विनोद परिट, सुरेश देवघरे, जिवन लोवंशी, संदिप सुर्वे, दिलीप ठाकरे, भालचंद्र गायकवाड, शैलैश सातपुते, संजय वरघडे, विनायक चितळे, ज्ञानेश्वर शिवेकर आदी कारसेवकांचा शाल, राम मंदिराची प्रतिकृती व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

सूत्रसंचालन साईनाथ श्रीखंडे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार विशाल जोशी यांनी मानले. या वेळी मोठे वेणगाव आणि धाकटे वेणगावमधील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री विठ्ठल मूर्तीच्या परिसरातील गणेश घाटावर आमदार महेंद्र थोरवे फाउंडेशन व श्री राममंदिर न्यासाच्या वतीने हरिपाठ, भजन व संगीत मैफलीचे आयोजन करण्यात आले होते. दीपोत्सव व महाआरती झाल्यानंतर आमदार थोरवे यांच्या हस्ते शाल, राममंदिराची प्रतिकृती व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी पोलीस उपविभागीय अधिकारी विजय लगारे, निरीक्षक सुरेंद्र गरड, शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष भोईर, उपजिल्हाप्रमुख भाई गायकर, भाजपचे मंडल अध्यक्ष राजेश भगत, नगरसेवक संकेत भासे आदी उपस्थित होते.

# वरसे येथे सुसंवाद प्रशिक्षण कार्यशाळा




**रोहे : प्रतिनिधी**

सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज लि. अंतर्गत सीएसआर प्रमुख माधुरी सणस यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नोती अभियान पंचायत समिती रोहा यांच्या सहकार्यातून वरसे या ठिकाणी तालुक्यातील सर्व सीआरपी, महिला बचत गटाचे अध्यक्ष, सचिव, सदस्य यांच्यासाठी सुसंवाद प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळेत लेखक, सामाजिक कार्यकर्ते व व्यसनमुक्ती प्रेरणा संवर्धनतज्ज्ञ किशोर काळोखे यांनी समजुतदार, सहनशीलता, सुसंवाद, समुदाय संवाद, ताणतणावमुक्त जीवन याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यशाळेस महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोनती अभियान रोहा पंचायत समितीचे अक्षय खंदारे, रवींद्र राठोड, नेहा पाटील, सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज लि. सीएसआर विभागाचे चेतन चौधरी तसेच तालुक्यातील सीआरपी व महिला बचत गट, प्रभाग संघ, ग्रामसंघचे अध्यक्ष, सचिव आणि सदस्य अशा एकूण ११० महिला उपस्थित होत्या. सूत्रसंचालन व आभार अमर चांदणे यांनी व्यक्त केले.

# रोह्यातील मेहंदळे हायस्कूल येथे जयंती कार्यक्रम



**नागोठणे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील कोकण एज्युकेशन सोसायटीच्या मेहंदळे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात मंगळवार (दि.२३) प्राचार्य रमेश मोसे यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वर्गीय प्रभाकर पाटील उर्फ भाऊ तसेच हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि नेताजी सुभाषचंद्र बोस या वीर पुरुषांची जयंती साजरी करण्यात आली.

विद्यालयाचे प्राचार्य रमेश मोसे यांनी या तीनही वीर पुरुषांच्या प्रतिमेचे पूजन केले व पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. या वेळी शाळेतील ज्येष्ठ शिक्षक के. आर. पाटील, नारायण पानसरे,भिवा कोकरे,संग्राम गायकवाड, कीर्ती पाटील सुनंदा साळुंखे, कुंदा फूलगावकर, प्रज्ञा दांडेकर व इतर शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे औचित्य साधून शाळेतील ज्येष्ठ शिक्षक के. आर. पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या वतीने बोलताना साहिल मोटे या विद्यार्थ्यांनी स्व. प्रभाकर पाटील यांच्याविषयी महिती दिली.


# म्हसळा वाचनालयात सुभाषचंद्र बोस, बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी

**म्हसळा : प्रतिनिधी**

केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालय म्हसळा येथे मंगळवार (दि.२३) जानेवारी रोजी नेताजी सुभाष चंद्र बोस यांची १२७वी आणि हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची ९८ वी जयंती साजरी करण्यांत आली.

या वेळी वाचनालयाचे अध्यक्ष संजय खांबेटे, माजी सभापती महादेवराव पाटील, दिलीप करंबे, राहूल पोतदार, तालुका प्रमुख प्रसाद बोर्ले, उपतालुका प्रमुख प्रविण बनकर, अरविंद शिंदे दिपेश जाधव, नामदेव घुमकर, स्वप्निल चांदोरकर, हरिश्चंद्र नाक्ती, कृषी विभागाचे आर. ए. ढंगारे, सुजय कुसळकर, रामेश्वर मगर, विनोद सोनावणे, डी. पी. सरनाईक, अशोक सानप, कल्पना शेळके, परेश नाकती, ग्रंथपाल उदय करडे, लिपीक सायली चोगले, मदतनीस प्राची मेंदडकर आदी उपस्थित होते.

या वेळी विचारांचं सोनं, एकवचनी, शिवधनुष्य, भांडवलाचा सरजामी देव, मी हिंदू झालो, सुवर्ण महोत्सवी शिवसेना, नेताजी निवडक चरित्रे, ओळख थोर नेत्यांची, महापुरूषांची महायात्रा, साहित्यिक आणि थोर भारतीय विचारवंत, महाराष्ट्रातील समासुधारक संत आदी ग्रंथाचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. नेताजी सुभाष चंद्र बोस आणि हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे जिवनपटावरील पुस्तकांचे वाचनालयातर्फे प्रदर्शन भरविण्यात आले होते.




# सामवेद संगीत वर्गाच्या रौप्य महोत्सवानिमित्त ज्येष्ठांचे गायन

**कर्जत : प्रतिनिधी**

सामवेद संगीत वर्गाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित संगीत सभेच्या सोहळ्यात ज्येष्ठ सदस्यांनी विविध गीतांचे सादरीकरण करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या वेळी कर्जतकरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

मंदार सोमण संचलित सामवेद संगीत विद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्ष सोहळ्याचे आयोजन महिला मंडळ सभागृहात करण्यात आले होते. सोमण यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून समारंभाचे उद्घाटन झाले. या कार्यक्रमास वरदा सोमण, आसावरी काळे, उमा डोंगरे, स्नेहा गोगटे, वैजयंता ठोसर, जोत्स्ना शिंदे, गणेश ठोसर आदी उपस्थित होते.



यानंतर पूर्वार्धात सोमण यांच्या शिष्या वर्षा जोगळेकर, उमा डोंगरे, सुरेखा पटवर्धन, संध्या भडसावळे, स्नेहल साठे, जयश्री रानडे, विनायक रानडे, आसावरी काळे यांनी गीते सादर केली; तर उत्तरार्धात जान्हवी ठोसर, स्नेहा गोगटे, स्वाती भोईर, गंधाली दाते, आरंभ गायकवाड, दिव्या दगडे, सायली मळेवाडकर, कांचन कुंटे, कामिनी दांडेकर, प्रसाद जोशी, गौरव दांडेकर, स्वरा सुर्वे आदींनी हिंदी-मराठी गीते सादर केली. त्यांना सुराज सोमण यांनी तबल्यावर, तर मंदार सोमण यांनी संवादिनीवर साथ संगत दिली. आसावरी काळे व जान्हवी ठोसर यांनी सूत्रसंचालन केले.

# कर्जतमध्ये सोमजाई मातेचा उत्सव उत्साहात

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील सांगवी येथील सोमजाई माता उत्सव सोहळ्यात आयोजित खेळ पैठणीच्या कार्यक्रमात तब्बल १७ हजार महिलांनी सहभाग घेतला.

जि. प. माजी उपाध्यक्ष आणि सांगवी गावाचे ग्रामस्थ सुधाकर घारे यांच्या माध्यमातून सोहळा आयोजित करण्यात आला. या सोहळ्याला आमदार अनिकेत तटकरे, राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस अशोक



भोपतराव, राष्ट्रवादी जिल्हा कार्याध्यक्ष हनुमंत पिंगळे, युवक जिल्हाध्यक्ष अंकित साखरे, महिला अध्यक्ष उमा मुंडे, कर्जत तालुकाध्यक्ष भगवान चंचे, महिला तालुकाध्यक्ष ॲड. रंजना धुळे, तालुका उपाध्यक्ष मधुकर घारे आदी उपस्थित होते.

भारती घारे आणि खांडपे ग्रामपंचायतीच्या सरपंच नमिता सुधाकर यांनी हळदी, कुंकू आणि साडी भेट दिली. या वेळी सिने अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, प्राजक्ता माळी, सायली देवधर, ज्ञानदा रामतीर्थकर यांची उपस्थिती होती. या वेळी पारितोषक म्हणून दहा विजेत्या महिलांना सोन्याची नथ आणि आणखी दहा विजेत्या महिलांना पैठणी देऊन सन्मानित करण्यात आले.

अंतिम विजेत्या टीव्ही संतोषी मिरकुटे, फ्रिज कविता पवार, वॉशिंग मशीन सीमा गंगाने, कुकर प्रियांका पिंगळे, ओव्हन वैष्णवी ठोंबरे, अक्का नम्रता मालकर, गॅस शेगडी सुजाता मालकर, मिक्सर अलका कराळे, फॅन प्रिती महाडिक यांना सन्मानित करण्यात आले.

# भारत-इंग्लंड यांच्यात आज ‘कसोटी’

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड यांच्यामध्ये गुरुवारपासून पाच सामन्याच्या कसोटी मालिकेला सुरुवात गुरुवारी (दि. २५) होणार आहे. हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर भारत आणि इंग्लंडचे संघ आमनेसामने असतील.

इंग्लंडच्या संघाने त्याआधीच आपल्या प्लेईंग ११ची घोषणा केली आहे. दुसरीकडे भारतीय संघात कुणीची वर्णी लागणार याबाबत चर्चा सुरू आहे. विराट कोहलीने पहिल्या दोन कसोटी सामन्यातून माघार घेतली आहे. रजत पाटीदार याला रिप्लेसमेंटची घोषणा केली आहे. इंग्लंडकडून हॅरी ब्रूकच्या जागी ओली पोप खेळणार आहे. १२ वर्षांपासून इंग्लंडच्या संघाने भारतात मालिका जिंकलेली नाही. भारतात मालिका जिंकण्यासाठी इंग्लंडचा मैदानात उतरले. भारत आणि इंग्लंड यांच्यातील



पहिला कसोटी सामना २५ जानेवारी रोजी हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर होणार आहे. भारतीय वेळेनुसार सकाळी ९.३० मिनिटांनी सामन्याला सुरुवात होणार आहे.

भारतीय चाहते हा सामना स्पोर्ट्स १८ नेटवर्कवर लाईव्ह पाहू शकतात. त्याशिवाय मोबाईलवर जिओ सिनेमावरही लाईव्ह स्ट्रिमिंग पाहता येईल. जिओ सिनेमावर चाहते हिंदी, इंग्रजीशिवाय इतर भाषांमध्ये सामन्याचा आनंद घेऊ शकतात.

जिओ सिनेमावर सामना पाहण्यासाठी सब्सक्रिप्शन घ्यावे लागणार नाही. म्हणजे फुकटात सामना पाहता येणार आहे. मोबाईलमध्ये जिओ सिनेमाचे ॲप असेल, तर अथवा वेबसाईटवरही जाऊन मोफत सामना पाहता येईल.

### पहिल्या कसोटी सामन्यासाठी इंग्लंडची प्लेईंग ११

बेन स्टोक्स (कर्णधार), रेहान अहमद, जॉनी बेयरस्टो (विकेटकीपर), शोएब बशीर, जॅक क्रॉली, बेन फॉक्स (विकेटकीपर), टॉम हार्टले, जॅक लीच, ओली पोप, जो रूट आणि मार्क वूड.

### असा असेल संघ

रोहित शर्मा (कर्णधार), शुभमन गिल, यशस्वी जयस्वाल, श्रेयस अय्यर, केएल राहुल, केएस भरत व ध्रुव जुरेल (विकेटकीपर), रविचंद्रन अश्विन, रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, कुलदीप यादव, मोहम्मद सिराज, मुकेश कुमार, जसप्रीत बुमराह (उपकर्णधार), आवेश खान, रजत पाटीदार.

# सूर्यकुमार टी-२० प्लेअर ऑफ द इयर

## सलग दुसऱ्यांदा मिळाला पुरस्कार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयसीसी टी-२० प्लेअर ऑफ इयरच्या पुरस्कारावर सूर्यकुमार यादवने आपले नाव कोरले आहे. भारताचा मधल्या फळीतील धडाकेबाज फलंदाज अशी ओळख असलेल्या सूर्यकुमार यादवने २०२३साठी टी-२० प्लेअर ऑफ द इयरचा पुरस्कार पटकावला. त्याने टी-२०मध्ये जवळपास १५०च्या स्ट्राईक रेट आणि ५०च्या सरासरीने धावा केल्या आहेत. सूर्यकुमार यादव सध्या घोट्याच्या दुखापतीतून सावरत आहे. तो आता थेट टी-२० वर्ल्डकपमध्येच भारताकडून खेळताना दिसेल.

सूर्यकुमार यादवने गेल्या वर्षी १७ डावात ७३३ धावा केल्या आहेत. त्याने या धावा ४८.८६च्या सरासरीने आणि १५५.९५च्या स्ट्राईक रेटने केल्या. २०२३मध्ये वेस्ट इंडीज



आणि श्रीलंका यांच्याविरूद्धच्या मालिकेव्यतिरिक्त सूर्यकुमार यादवने ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेविरूद्ध अर्धशतकी खेळी केली. त्याने ऑस्ट्रेलियाविरूद्ध ४२ चेंडूंत ८०, तर दक्षिण आफ्रिकेविरूद्ध ३६ चेंडूंत ५६ धावा केल्या आहेत. त्याने दक्षिण आफ्रिकेविरूद्ध ५६ चेंडूंत १०० धावादेखील केल्या होत्या. हे शतक मालिकेतील फायनल सामन्यावेळी ठोकले होते.

सूर्याने जानेवारी महिन्यात श्रीलंकेविरूद्ध ५१ चेंडूंत ११२ धावा ठोकल्या होत्या. त्यात नऊ षटकार व सात चौकारांचा समावेश होता. त्याने प्रत्येक तीन चेंडूनंतर चौकार मारला होता. त्याचे हे शतक टी-२० क्रिकेटमधील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वांत वेगवान शतक होते. यापूर्वी रोहित शर्माने २०१७मध्ये ३५ चेंडूंत शतक ठोकले होते.

### आत्माराम मोरे शालेय कबड्डी स्पर्धा

# पूर्व विभागातून अफॅक स्कूल प्रथम

**मुंबई : प्रतिनिधी**

ज्येष्ठ क्रीडा पत्रकार स्व. आत्माराम मोरे स्मृती आंतर शालेय सुपर लीग विनाशुल्क कबड्डी स्पर्धेमधील पूर्व मुंबई विभागातून अफॅक



स्कूल-चेंबूर संघाने प्रथम क्रमांक पटकाविला. आत्माराम मोरे प्रतिष्ठान व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी आयोजित विभागीय स्पर्धेमध्ये अफॅक स्कूलने चुनाभट्टी मुंबई पब्लिक स्कूलचे आव्हान ५०-४५ असे संपुष्टात आणून सुपर लीगमधील स्थान निश्चित केले. दक्षिण मुंबई विभाग स्पर्धेला २ फेब्रुवारीपासून डॉकयार्ड-माझगाव येथे प्रारंभ होणार आहे.


पूर्व मंबई विभागाच्या निर्णायक सामन्यात अष्टपैलू विराज जुजार, कृष्णा तेली, विनितेश शावी यांच्या आक्रमक खेळामुळे अफॅक स्कूलने चुनाभट्टी स्कूलविरुध्द पहिल्या डावात ३४-१८ अशी मोठी आघाडी घेतली. उशिरा सूर सापडलेल्या अनिश भुल, ओमकार भावे, बसंत साउद यांच्या उत्तरार्धातील दमदार खेळामुळे चुनाभट्टी स्कूलने बाजी उलटविण्यासाठी शर्थीची झुंज दिली. परंतु मध्यंतराच्या १४ गुणांच्या आघाडीमुळे अफॅक स्कूलने अखेर ५०-४५ असा ५ गुणांनी विजय संपादन केला. याप्रसंगी प्रशिक्षक सुनील खोपकर व शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण यांनी शालेय खेळाडूंना मार्गदर्शन केले.

# रोहन बोपन्नाची ऑस्ट्रेलियन ओपनच्या सेमीफायनलमध्ये धडक

## दुहेरीच्या जागतिक क्रमवारीत अव्वलस्थानी

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

भारतीय टेनिस स्टार रोहन बोपन्ना याने इतिहास रचला आहे. रोहन बोपन्ना आणि मॅट एबडेन यांनी ऑस्ट्रेलियन ओपनची सेमीफायनल गाठली आहे. ४४ वर्षांच्या रोहन बोपन्ना आणि मॅट एबडेन यांनी क्वॉर्टर फायनलचा सामना ६-४, ७-६ (७-५)ने जिंकत सेमीफायनलमध्ये दणक्यात प्रवेश केला. रोहन आणि मॅटने आपल्या या विजयासोबतच आणखी एक विक्रम रचला आहे. रोहन आणि मॅट मेन्स डबल्समध्ये जागतिक क्रमवारीत अव्वलस्थानी पोहचले आहेत.



ऑस्ट्रेलियन ओपनच्या क्वॉर्टरफायनलच्या सामन्यात अर्जेंटिनाच्या मॅक्सिमो गोन्झालेझ आणि आंद्रेस मोल्टेनी यांचा सामना रोहन बोपन्ना आणि मॅट एबडेन यांच्यासोबत खेळवण्यात आला, मात्र रोहन बोपण्णा आणि मॅट एबडेन यांनी विरोधी खेळाडूंना संधीच दिली नाही. सामना सुरू झाल्यापासूनच रोहन आणि मॅट मॅक्सिमो गोन्झालेझ आणि आंद्रेस मोल्टेनी यांच्यावर अक्षरशः तुटून पडले. या सामन्यात मॅक्सिमो गोन्झालेझ आणि आंद्रेस मोल्टेनी यांचा ६-४, ७-६ (७-५) असा पराभव झाला. रोहन बोपण्णा आणि मॅट एबडेननं ऑस्ट्रेलियन ओपनच्या सेमीफायनलमध्ये दणक्यात प्रवेश केला. तसेच रोहन बोपन्ना आणि मॅट एबडेन हे पुरुष दुहेरीत जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी पोहोचले आहेत.

दुहेरीच्या जागतिक क्रमवारीत अव्वल स्थान खूपच आनंददायी आणि समाधान देणारी गोष्ट आहे. मी स्वतः अजून ही गोष्ट मनाला पटवू शकलेलो नाही. गेले दीड वर्ष माझ्या कामगिरीत सातत्य राहिलं आहे. आज मी ज्या ठिकाणी पोहोचलो आहे तो प्रवास आणि हे स्थान याबद्दल प्रचंड अभिमानास्पद वाटते आहे. भारतीय टेनिसपटू क्रमवारीत अव्वल स्थानी हे भारतीय टेनिससाठी आवश्यक आहे. देशवासीयांनी दोन दशकांहून अधिक अशा कारकीर्दीत वेळोवेळी मला पुरेपूर प्रेम आणि पाठिंबा दिला आहे. त्यांच्या सदिच्छा माझ्यासाठी अतिशय मोलाचे आहेत. माझ्या मते क्रमवारीत अव्वल स्थान हे माझ्याकडून त्यांच्याप्रति ऋण व्यक्त करण्यासारखं आहे, अशा शब्दात रोहनने आपल्या भावना व्यक्त केल्या.

कारकीर्दीत रोहनच्या नावावर मिश्र दुहेरीचं एक जेतेपद आहे. २०१७ मध्ये फ्रेंच ओपन स्पर्धेत रोहनने कॅनडाच्या गॅब्रिएला डाब्रोव्हस्कीच्या बरोबरीने खेळताना जेतेपदावर नाव कोरलं होतं. पुरुष दुहेरीत, २०१० मध्ये अमेरिकन ओपन स्पर्धेत त्याला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. गेल्या वर्षी याच स्पर्धेत इब्डेनबरोबर खेळताना जेतेपदाने निसटती हुलकावणी दिली होती.

# कामोठ्यात रंगली नमो चषक ज्युडो स्पर्धा | डॉ. रूपेश वडगावकर यांच्या हस्ते उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्याला अभिवादन करण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल विधानसभा क्षेत्रात भव्य कला, क्रीडा आणि सांस्कृतिक महोत्सव असलेला नमो चषक आयोजीत करण्यात आला आहे. त्या अंतर्गत बुधवारी (दि. २४) कामोठेत नमो चषक ज्युडो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेचे डॉ. रूपेश वडगावकर यांच्या हस्ते उद्घाटन





झाले. या वेळी माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, विकास घरत, भाजप नेते भाऊ भगत, पनवेल तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष पंकज भगत, सिद्धीविनायक स्कूचे मुख्याध्यापक अभिजीत देशमुख, चंद्रकांत जाधव, अनंत धरणेकर, अदित्य भगत, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, मंदार पनवेलकर, खांदेश्वर पोलीस अधिकारी बलवंत पाटील यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

या स्पर्धेचे माजी नगरसेवक दिलीप पाटील, सागर कोळी, विनोद खेडकर, उत्तम जाधव आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आयोजन केले होते. या स्पर्धेतील विजेत्यांना २५ हजार रुपयांची बक्षिसे तसेच सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

## रणजीपटू तुकाराम सुर्वे यांचे निधन

**ठाणे : प्रतिनिधी**

ठाणे भूषण पुरस्काराचे मानकरी आणि गुजरातचे रणजीपटू तुकाराम सुर्वे (वय ९१) यांचे बुधवारी (दि. २४) निधन झाले. त्यांच्या पश्चात क्रिकेटपटू अतुल आणि कन्या असा परिवार आहे.

तुकाराम सुर्वे हे १९१५ साली स्थपन झालेल्या ठाणे फ्रेंड्स युनियन आणि मफतलाल क्रिकेट क्लबचे ते कार्यवाहक होते. मुंबई क्रिकेट संघटनेच्या १४, १६ वर्षाखालील संघाचे ते प्रशिक्षक आणि व्यवस्थापक होते. १९८२ ते १९९६ दरम्यान ठाण्याच्या दादोजी कोंडदेव स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सहा रणजी सामन्यांचे ते समन्वयक होते. भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार नरी कॉन्ट्रॅक्टर यांच्या जोडीने तुकाराम सुर्वे गुजरातच्या डावाची सुरुवात करत असत. एक चपळ आणि दक्ष यष्टीरक्षक म्हणून त्यांची ख्याती होती. यंदा शताब्दी वर्ष साजरे करत असलेल्या स्पोर्टिंग क्लब कमिटीने त्यांचा जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मान केला होता.

# वगळलेल्या खेळांचा शिवछत्रपती पुरस्कार यादीत समावेश

**मुंबई : प्रतिनिधी**

एखादा खेळ ऑलिम्पिकमध्ये नाही किंवा या खेळाचा देशात प्रसार नाही अशी कारणे देऊन खेळांना राज्य क्रीडा पुरस्कारातून वगळायचे हे बरोबर नाही असा मुद्दा उपस्थित करत महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुरस्कारातून वगळलेल्या सातही खेळांचा पुन्हा समावेश करण्याच्या सुचना मंगळवारी क्रीडा अधिकाऱ्यांना दिल्या. यामुळे क्रीडा अधिकाऱ्यांना सात खेळांना छत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारातून वगळण्याचा निर्णय मागे घ्यावा लागला.

वगळलेल्या खेळाच्या संघटकांसह राज्यातील सर्वच क्रीडा क्षेत्रांतून या निर्णयाबद्दल नाराजीचा सूर उमटत होता. क्रीडा संचालनालयाशी या संघटकांकडून सातत्याने झालेल्या पत्रव्यवहारानंतर मंगळवारी मंत्रालयात महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. बैठकीस क्रीडा



मंत्री संजय बनसोडे, उद्योग मंत्री उदय सामंत, क्रीडा विभागाचे मुख्य सचिव ओमप्रकाश गुप्ता, क्रीडा आयुक्त सुहास दिवसे, उपसंचालक संजय सबनीस, महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे सरचिटणीस नामदेव शिरगांवकर, कॅरम संघटनेचे अरुण केदार, पॉवरलिफ्टगचे संजय सरदेसाई, जिम्नॅस्टिकचे महेंद्र चेंबुरकर, बिलियर्डसचे देवेंद्र जोशी, शरीरसौष्ठवचे विजय झगडे, मॉडर्न पेन्टॅथ्लॉनचे विठ्ठल शिरगांवकर बैठकीस उपस्थित होते.

सर्व संघटकांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर अजित पवार यांनी खेळाडूंची बाजू घेतली. खेळाडू आपली कारकीर्द घडविण्यासाठी उमेदीची वर्षे खर्च करीत असतो. आपल्या कौशल्याच्या जोरावर तो राज्यासह देशाचे नाव उज्ज्वल करतो. अशा वेळी त्यांच्या कामगिरीचा गौरव व्हायलाच हवा. शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार हे त्यासाठीच दिले जातात. त्यामुळे ऑलिम्पिकमध्ये समावेश नाही म्हणून खेळांना वगळणे योग्य नाही. खेळांच्या स्पर्धा होतात म्हणजे प्रसारही आहे. असे मुद्दे उपस्थित करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या सर्व खेळांचा पुन्हा पुरस्कारासाठी समावेश करण्याच्या सूचना दिल्या.

या निर्णयानंतर तातडीने सरकार पातळीवर बदल करण्यात येत असून, या खेळांसाठीचे अर्ज या वर्षीही स्वीकारण्यात येतील, असे क्रीडा उपसंचालक संजय सबनीस यांनी सांगितले. पुरस्कारासाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज करण्याची मुदत २२ जानेवारी रोजी संपली असली, तरी आता ही मुदत या निर्णयानंतर या खेळांसाठी वाढवली जाईल, असे समजते.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com